


# माणूस

२९ सप्टेंबर १९७३

पन्नास पैसे

## पुढील अंकी



श्री. ग. माजगावकर

२९ सप्टेंबर १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : तेरावे । अंक : अठरावा

## सप्रेम नमस्कार....

दि २४-९-७३

◻ 'पुन्हा एकदा लेखन स्वातंत्र्य' या आपल्या संपादकीय टिपणाबद्दल आभारी आहे. मतस्वातंत्र्याच्या प्रश्नावर महाराष्ट्रातील बुद्धिवंत माझ्यामागे उभे राहतील याची मला खात्री होती. मी आपला आणि दुसऱ्या अनेक मंडळींचा आभारी आहे. मी मराठवाडा विद्यापीठातील माझ्या पदाचा राजिनामा दिला तो विचारस्वातंत्र्याच्या लढ्यातील पाय काढून घेण्यासाठी नव्हे. त्या लढाईत मी आपणास कधीही निराश करणार नाही. राजिनाम्याचे कारण दुसरे आहे. मी गेले सहा महिने इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च या संस्थेने प्रेरित केलेल्या संशोधन प्रकल्पात गुंतलो आहे. माझी मूळ नोकरी अर्थातच विद्यापीठात होती. लेखावरून उठविण्यात आलेल्या वादळात हे संशोधन प्रकल्पाचे कार्य निर्विघ्नपणे पार पाडता यावे म्हणून मी राजिनामा दिला आहे. आता मी मोकळा आहे. कोर्टात मी माझी बाजू मांडीन आणि संशोधन प्रकल्पही पूर्ण करीन. मी आपला आभारी आहे.

**पंढरीनाथ रानडे**, औरंगाबाद

१९ सप्टेंबर, ७३

◻ १५ सप्टेंबर १९७३ च्या अंकातील संध्याकाळच्या गप्पा हा लेख त्याचप्रमाणे 'शतपावली'मधील कवीची सुखद भेट हा लेख अतिशय आवडला.

कविवर्य कुसुमाग्रजांची प्रतिमा बरोबर शब्दांकित करण्याचा हा प्रयत्न खरोखर सुखद आहे.

'चार्लस बॅबेज' हा नंदकुमार रेग यांचा लेख असाच सुंदर माहितीपर आहे. 'सोनेरी साहस' ही कथा मनाचा वेध घेते. उत्कृष्ट सत्यरहस्य कथा.

अशाच साहित्याची माणूसकडून पुढे अपेक्षा.

**प्रा. बा. र. बोरसे**, बीड (मराठवाडा)

मुखपृष्ठ ठसे : सोलापूर समाचारच्या सौजन्याने

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

औरंगाबाद
१९।९।७३

स. न.

सोबत मानवत बाबतचे वार्तापत्र पाठवले आहे. मानवतमधे Confusion वाढतच आहे. पोलिसांच्या कामगिरीबद्दल पुन: पुन: शंका येऊ लागली आहे. पुण्याचे S. P. CID श्री. वर्मा तेथे आहेत. अधिकारी चांगला व कार्यक्षम वाटला. तरीही एकूण कथा निराशाजनकच आहे. मी स्वत: मानवतमधे मुक्काम ठोकूनच आहे.

मराठ्यांचा लेख वाचला. (सांस्कृतिक क्रांतीची सुरुवात) आवडला. हीच तर माणूसची विशेषता आहे.

मानवतमधे येणारा प्रत्येक पोलीस अधिकारी माणूसचे अंक घेऊनच तपासाला येतो हे मी परवा प्रत्यक्ष पाहिले. माणूसचा शब्दन् शब्द त्यांनी नाटकाचे पाठांतर करावे तसा पाठ करून टाकला आहे. मजा वाटली आणि एका अर्थाने हे आपले यशही आहे असे वाटले. एकदा तर तुमच्यावतीने फुकट भाव खाऊन घेतला.

गेल्या आठवड्यात मुंबईला गेलो होतो. जॉर्ज फर्नांडिस भेटले होते. त्यांची पत्रकार परिषद चालली होती. मला पाहून त्यांनी कोणत्या वृत्तपत्रासाठी आला म्हणून विचारले. मी 'माणूस' 'मराठवाडा' सांगितले. त्यांच्याबरोबर बाहेरच्या राज्यातले काही कामगार पुढारी होते. त्यांनी 'माणूस' काय आहे म्हणून विचारले. तेव्हा जॉर्ज म्हणाले, की महाराष्ट्रातलेच नव्हे तर अख्ख्या हिंदुस्थानातले हे एक खूप खोलात जाऊन Incisive असे Coverage देणारे हे एक वेगळे व चांगले साप्ताहिक आहे, एकमेव आहे; विचार करणाऱ्या Intelligenlia मधे वाचले जाते असे इतरांना भर पत्रकार परिषदेत सांगितले. मी पुन्हा एकदा भाव खाऊन घेतला. तुमच्या वतीने पुन्हा भाव मारला.

इथं तुंगारांना घेराव केल्याचे वगैरे तुम्ही वाचलेच असेल. विचित्र आहे.

—निळू दामले

---

## दि. १४ सप्टेंबर.

रस्ता सुरक्षा दलाच्या औरंगाबाद शाखेचे उदघाटन करण्यासाठी अतिरिक्त, आय. जी. पी. मोडकसाहेब औरंगाबादला आले होते.

समारंभ एक आणि घोषणा दुसरीच काहीतरी करायची अशी सवय आपल्या इथे पुढाऱ्यांना लागली आहे.पोलिसांनीही तोच कित्ता गिरवायचे ठरवल्यासारखे वाटते. वरील समारंभात मोडकांनी मानवत प्रकरणात एक महत्त्वपूर्ण घोषणा केली. ४८ तासाच्या आत मानवत प्रकरणातल्या मुख्य आरोपीला पकडून देऊ अशी ती घोषणा. सर्व वृत्तपत्रांतून ती घोषणा आणि नंतरच्या धरपकडीचा वृत्तांत आला आहे.

१३ ला संध्याकाळी समारंभाचे वृत्त समजल्यावर रात्री त्यांना डाक बंगल्यावर गाठले.

# मानवत

## गोंधळ आणखी वाढतो आहे !

'रामन राघवच्या वेळी ४८ तासात त्याला अटक करू असे म्हटले होते. त्याला पकडून दाखवले.' मोडक.

'मग ह्यावेळीही तुम्ही मुख्य आरोपीला पकडून द्याल याची खात्री द्याल काय' मी.

हा मामला किती गुंतागुंतीचा आहे याची जाणीव जेवढी त्यांना आहे तेवढीच या प्रकरणी ज्यांनी खूप चौकशी केली आहे त्यांनाही आहे म्हणून मुद्दाम खोदून खोदून विचारले.

'रामन राघवच्या वेळी मला पूर्ण विश्वास होता. यावेळी 'जवळ जवळ पूर्ण विश्वास' वाटतो. शेवटी बाकीच्या गोष्टी परमेश्वराच्या हाती आहेत.' मोडक.

हा 'जवळ जवळ'चा भागच जास्त महत्त्वाचा होता.

मला मिळालेल्या माहितीनुसार १३ तारखेच्या आधी ८।१० दिवस धरपकडीचे–चौकशीचे सत्र जोरात चालू होते. काही लोकांना पोलिसांनी ताब्यातही घेतले होते. त्या पार्श्वभूमीवर मोडकांची घोषणा महत्त्वपूर्ण होती.

कोणाला पकडणार? आमच्या यादीतल्या नावांवर आम्ही लक्ष ठेवून होतो. मुक्काम मानवत ! सारखा फोनवरून मानवतशी संपर्क ठेवला होता !

दि. १५ सप्टेंबर.

संध्याकाळचे ७ वाजले.

मोडकांचे ४८ तास संपले होते.

परभणीच्या होम इन्स्पेक्टरांकडे विचारणा केली. कोणालाही अटक झालेली नाही असे त्यांचे म्हणणे. जितूरला असलेल्या डी. आय. जींशी संपर्क साधला. त्यांनाही काही माहीत नाही. मानवतला खुद्द सर्वच अंधारात–

मोडक साहेबांचा कारभार पहा. त्याच दिवशी सकाळी ९ वाजता बन्सी वाळकेला अटक केल्याचे वृत्त त्यांनी मुंबईत वार्ताहरांजवळ प्रकट केले. भीतीचे वातावरण परभणी जिल्ह्यात; आणि मोडकसाहेब बातमी देतात मुंबईत.

कुठेच काही हाती लागेना म्हणून मध्यरात्री मोडकसाहेबांनाच फोन लावला. तेव्हा त्यांनी सांगितले की वाळकेला अटक झाली आहे.

'हा माणूस गँगपैकी प्रमुख आहे का ?' मी.

'ह्याच मुख्य संशयित आहे, गँग वगैरे काही नाही, यानेच खून केले आहेत असे पोलिसांचे ठाम मत आहे.' मोडक.

म्हणजे अनेक लोकांनी मिळून हे खून केले आहेत हे मोडकांच्या शिपाई-दलाला मान्य नाहीसे दिसते.

कुठे पकडला, कसा पकडला याचा तपशील विचारायला सुरुवात केल्यावर मोडक म्हणाले,

'तुम्ही मानवतलाच चौकशी करा.'

प्रत्यक्षात मानवत पोलीस स्टेशन-मध्ये एकही जबाबदार अधिकारी हजर नव्हता आणि जे कोणी होते त्यांना काहीही माहीत नव्हते. सर्वोच्च पोलीस अधिकारी म्हणतात, आरोपीला मानवतमध्ये अटक केली आणि मानवत-मध्ये पोलिसांना काहीच माहीत नाही.

रात्री १२॥ वाजता, ज्यावेळी बातमी खरी आहे हे कळले तेव्हा लगेच पहाटे ५ वाजता मुक्काम मानवतला हलवला.

बरोबर मुंबईहून आलेले खास पोलीस अधिकारी होते. 'कोणीही बाहेरचा अधिकारी इथे येताना प्रथम 'माणूस'चे अंक घेतो, वाचतो आणि मगच मानवतमध्ये पाऊल ठेवतो.' अधिकारी सांगत होते...

मुक्काम मानवत :

कोण आहे हा बन्सी घनःशाम वाळके ?

हा आहे एक ३०–३५ वर्षांचा शेत-मजूर. मानवतमधलाच. वेगवेगळ्या शेतकऱ्यांच्या शेतावर आजपर्यंत काम करीत होता. उंचीने ५ फुटांच्या आतला. एका पायाने लंगडा. काठी घेऊन नेहमी चालतो. काठीशिवाय त्याला नीट चालता येत नाही; खुरडत चालतो. याला कोणी नातेवाईक नाहीत, सगे-सोयरे नाहीत. 'नंगा फकीर' आहे.

ह्या बन्सीकडे पाहिल्यावर तो खून करील असे वाटत नाही. खून झालेल्यां-पैकी एक २०–२२ वर्षांची बाई आहे. एवढ्या धडधाकट स्त्रीला मारणे किंवा नंतर ओढत नेऊन आडोशाच्या जागी लपवणे या माणसाला जमणे अशक्य आहे. ('माणूस'चे जुने अंक पहावेत. ज्या ठिकाणी प्रेते टाकण्यात आली होती त्या जागांची वर्णने पहावीत.)

हलीमाला पळवून नेण्याचा प्रयत्न तिच्या मृत्यूपूर्वी झाला होता. इतर दोन-तीन मुलींना पळवून नेण्याचा एका माणसाने प्रयत्न केला होता. या सर्वांचा जबाब पोलिसांकडे आहे. त्यामध्य तो माणूस लंगडा होता किंवा काठी घेऊन चालत होता असा उल्लेख कोणाच्याच जबाबात नाही.

बन्सीला पकडल्यावर मानवतमधला प्रत्येक माणूस आश्चर्यचकित झाला आहे. हा माणूस खून करणे शक्यच नाही, ही मानवतकरांची भावना आहे.

बन्सीचे जबाब घेणे चालू आहे. तो काही लोकांची नावे घेतो. पण नंतर दुसऱ्या दिवशी आधीचे लोक संशयित नाहीत असे सांगतो. दररोज नवीन नावे सांगत असतो. त्याच्या या असंबद्ध बोलण्याने पोलीसही हैराण झाले असणार !

शेवटला खून होऊनही १॥ महिन्या-पेक्षा जास्त काळ लोटला आहे. आता पोलीस खून झालेल्या आसपासच्या शेतातल्या शेतकऱ्यांच्या कुऱ्हाडी जप्त

करू लागले आहेत. कुऱ्हाडीचा ढीगच पोलिसांकडे पडला आहे ! बैलगाड्याही जप्त होत आहेत.

पोलिसांचा तपास जोरात सुरू आहे. ठिकठिकाणच्या शेतात खोदाखोद चालू आहे !

काय गौडबंगाल आहे ?

बन्सीला १०।१५ दिवसांपूर्वीच पोलिसांनी ताब्यात घेतले होते. तांत्रिक दृष्टयाच फक्त त्याला अटक झालेली नव्हती. बाकी व्यावहारिक अर्थाने तो १५ दिवस पोलिसांच्याच ताब्यात होता. परभणीच्या हॉस्पिटलमध्ये त्याचे एक्स रे काढून घेण्यात आले होते. 'पोलिसी पद्धतीने' त्याची उलट तपासणी चालूच होती.

म्हणजे १५ तारखेला त्याला अटक करणे म्हणजे फार्सच होता. मोडक मानवतला आले असताना त्यांच्या समोरच बन्सीचे काय करायचे हे ठरले होते. म्हणजेच १३ तारखेला ४८ तासात पकडण्याची घोषणा करून १५ तारखेला पकडण्याचे नाटक म्हणजे केवळ गमजा करून स्वतःची हुशारी मिरवण्याचा प्रयत्न होता असे म्हणायचे काय ? ही घोषणा मुंबईला करण्याचा हेतू काय ?

पोलीस खाते चिरडीला आल्यासारखे झाले आहे. कसेही करून कोणाला तरी अडकवायचे आणि 'हुश' करून मोकळे व्हायचे असा तर पोलिसांचा हेतू नाही ना ?

ही खून मालिका संपावी आणि खरे आरोपी पकडले जावेत असे मलाच नव्हे तर मराठवाड्यातल्या प्रत्येक सामान्य माणसाला वाटते आहे. पोलिसांच्या तपासात ढवळाढवळ करून त्यांना त्रास देण्याचा हेतू कोणीच बाळगणार नाही. पण ज्या प्रकारे पोलीस खाते वागते त्यामुळे नाईलाजाने त्यांच्यावर टीका करावी लागते.

आजपर्यंत कित्येक 'पुड्या' पोलिसांनी सोडल्या आहेत. मध्यंतरी कोणी आनंदमार्गीच या खुनापाठी आहे अशी अफवा पोलिसांनी पसरवली होती. आणि दोन दिवसात त्याला पकडणार असे एका जबाबदार पोलीस अधिकाऱ्याने सांगितले होते. आज बन्सी वाळकेला पकडले आहे. तो खून करू शकेल असे मानवतमधल्या शेंबड्या पोरालाही वाटत नाही. मग हा धूळफेकीचा प्रकार आहे काय ? की खरे खुनी मिळणारच नाहीत ? मानवतमधला प्रत्येक माणूस आज हा प्रश्न विचारतो आहे.

अजून तरी या प्रकरणावर पडदा पडला आहे असे म्हणता येणार नाही.

● ● ●

# निवासी डॉक्टर

## बुद्धिजीवी बाबू की कसबी कामगार?

डॉ. संदीप पेंडसे

मुंबईच्या निवासी डॉक्टरांच्या जगात काही खळबळ चालली असल्याची कल्पना जूनपासूनच येवू लागली होती. संप होण्याची शक्यता बोलून दाखवली जात होती. पण त्याबरोबरच जाणवत होता एकजुटीचा व संघटनेचा अभाव. 'बार्ड'च्या बैठकीला ३–४ माणसेच जमत. त्या मुळे असे काही प्रत्यक्षात या पांढरपेशा, मूलतः बाबू लोकांच्या हातून घडेल यावर विश्वास बसत नव्हता. इतर क्षेत्रात काही प्रमाणात काम करणारे त्यांच्यातलेच लोक या प्रश्नाबाबत पूर्ण उदासीनच होते. हा संप खरोखरच होऊ शकेल असे वाटतच नव्हते.

अचानक ऑगस्टमध्ये ऐकले १७ तारखेपासून बेमुदत संप!

वाटला शुद्ध खुळचटपणाच. खुद्द डॉक्टरांना फारशी कल्पना नसलेला हा कुठला अचानक विचित्र संप! कुणातरी अतिउत्साही बालबुद्धी नेत्याचे हे काम असणार. नक्कीच बारगळणार!

पण ऑगस्टची १७ तारीख उजाडली आणि एकही निवासी डॉक्टर कामावर गेला नाही. झाला तो १००% संप. महाराष्ट्रभर. सरकारने बंदी घातलेली असून सुद्धा. चक्क बेकायदा.

खरे वाटेना. माहिती नसलेल्या, जवळ जवळ लादल्या गेलेल्या नेतृत्वाचे इतक्या आंधळेपणाने ऐकले जाते कसे? ते ही लढ्याची परंपरा, एकजूट काही नसलेल्या मध्यम वर्गीयांकडून! अन् होतो तो एकदम बेमुदत संप, लढ्याचे इतर मार्ग न चोखळताच. डॉक्टर या प्रकारच्या कुठल्याही विश्लेषणात हे बसेना. बुद्धिजीवी मध्यमवर्गीयांचे केवळ आर्थिक प्रश्नावरील आंदोलन, आणि ते या तऱ्हेने जावे! और प्रकारचा आणि और वर्गाचाच हा ट्रेड युनियनिझम.

हळू हळू काही सत्ये बाहेर येवू लागली. मागण्या पोटतिडिकेच्या होत्या. रुग्णांशी संबंधित (क्लिनिकल) बाजूच्या डॉक्टरांवरच हा केवळ अन्याय होता. २४ तास काम, आठवड्यातील ७ दिवस, वॉर्डमधल्या रुग्णांची पूर्ण

जबाबदारी. याबद्दल मिळणार रहायला खुराडी (काही अपवाद – सायन हॉस्पिटल, के. ई. एम. रजिस्ट्रार्स क्वार्टर्स), अन् तुटपुंजा पगार. ३१२ ते ४६२. पण रुग्णांशी संबंधित नसलेल्या शैक्षणिक, प्रशासकीय अथवा प्रायोगिक बाजूकडे तुम्ही गेलात तर मात्र ८ तास काम, मर्यादित जबाबदारी, रविवारी व इतर सार्वत्रिक सुट्टया, एक महिनाभर पगारी रजा, आणि रु. ७७९ पगार.

गेल्या संपातली आश्वासने चार वर्षात पूर्ण न झालेली. विनवण्या, अर्ज, विनंत्या, शिष्टमंडळे, बोलणी, समित्या व आश्वासने यांच्या उपयोगाचा पूर्ण अनुभव आणि स्वतःच्या ताकदीवरचा पूर्ण विश्वास. आपल्याशिवाय काम होणारच नाही ही मनोमन खात्री. पूर्व-तयारीची फारशी गरज यामुळे पडली नाही.

संपाचे नेतृत्वसुद्धा तसे गमतीदार होते. डॉ. जॉर्ज मथाई हे बहुतेकांच्या लेखी केवळ एक नाव होते. पण तशी नेतृत्वाची गरज कुणाला भासेना. संप तर होऊ दे बाकी पुढे पाहू ही वृत्ती.

संघटना तितकीच विचित्र. आता-पर्यंत मुंबईच्या डॉक्टरांची एक मरगळ-लेली नामधारी संघटना असायची. बॉम्बे असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स – (बार्ड) – या वेळी ती फोफावली, महाराष्ट्रभर पसरली अन बनली महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स ('मार्ड').

संपाची हाक दिली या जेमतेम दोन आठवड्यापूर्वी अस्तित्वात आलेल्या नव-जात संघटनेने.

आणि संप घडला.

¤

१७ ऑगस्ट १९७३.

प्रचंड गोंधळ.

सरकारने मेन्टेनन्स ऑफ असेन्शि-अल सर्विसेस ॲक्ट लावलाय. कदाचित डिफेन्स ऑफ इंडिया रूल सुद्धा. संपावर बंदी घातलीय. तो बेकायदा ठरवलाय.

पुढे काय ? संप, तो तर होणारच आणि झालाच.

मेस हॉलमध्ये प्रचंड गर्दी अन् गोंगाट.

एका कोपऱ्यात कृती समितीची बैठक. तिच्या भोवती १००–१५० लोकांचा गराडा. सारीच खुली लोक-शाही. तावातावाने चाललेल्या चर्चा, माफक भांडणे.

इतर हॉस्पिटलचे प्रतिनिधी लग-बगीने येतात, झटपट निरोप दिले-घेतले जातात.

–मेसचे फोन कापले गेले.

मेस व हॉस्पिटलच्या मधला कॉरि-डॉर पालिका सुरक्षा दलाने अडवला.

संपवाल्यांना हॉस्पिटल वा कॉलेज-मध्ये प्रवेश बंदी.

के. ई. एम. सारख्या ठिकाणी डीन चिडलेल्या हुकूमशहासारखे. त्यांचे हुकूमावर हुकूम. आणि प्रत्येक वेळी त्यांच्या नावाने मेसमध्ये शंख.

संपापूर्वीच करायला हव्या होत्या त्या अनेक गोष्टी आता लक्षात येऊ लागतात. घाईघाईने एक गट राजकीय नेत्यांमागे धावतो. दुसरा कायदे पंडि-

तांच्या. सुसूत्रता जवळ जवळ नाहीच. सगळा भर खुली प्रत्यक्ष लोकशाही आणि स्वयंस्फूर्ती यावर. नेतृत्वाची बैठक पक्की व्हायला अजून थोडा वेळ लागणार होता.

पुढे काय करायचे याबद्दल मने धुरकटलेली.

कायदा पाळायचा की ठोकरायचा? बंदी हुकूम मोडलाच. इतर नियमांचे काय? काही कोपऱ्यातून कायदा मोडण्याच्या मागण्या, मोर्चे, सभा, पर्यायी बाह्य ऋग्ण विभाग यांचा आग्रह. काही मनात धडक मोर्चे, घेराओ सुद्धा.

बहुतेक मनात गोंधळ, सुप्त भीती. काही कोपरे चक्क भेदरलेले.

अफवा वारेमाप.

पहिला दिवस केवळ गोंधळाचा.

¤

१८ ऑगस्ट १९७३.

निश्चित कार्यक्रम काहीच नाही. गोंधळ चालूच.

सगळ्या प्रकरणाला आज विनोदाचे अस्तर.

काम कसे अडकलेय याच्या कहाण्या.

सर्जन्सवर ताण वाढलाय—सलाईन लावू शकणारे साहेब फक्त तेच वगैरे.

संपवाल्यांची मुख्य छावणी जे. जे.

ॲस्बेस्टॉसच्या पत्र्यांनी बांधलेल्या एका खुराड्यात चिरडावीत इतकी माणसे. बाहेर वरांड्यात सुद्धा.

आतून येतोय तो आवाज जॉर्जचा.

आता काही इतर नावेही माहिती होऊ लागली.

ही पुण्याहून आलेली मीना पुराणीक.

हा के. ई. एम. चा के. ए. मेहता.

दुपारी ३॥–४ ला जे. जे. मध्ये आरोग्य-सचिवाकडून नोटीसा.

'तुम्ही बेकायदा संपावर गेला आहात. तुम्हाला कामावरून काढून टाकण्यात येत आहे.

तुम्हाला दिलेल्या खोल्या रात्री बारा वाजेपर्यंत खाली कराव्यात.'

४॥ ला जॉर्जचे के. इ. एम. ला भाषण. प्रचंड मागणीवरून. नोटिसांना केराची टोपली दाखवा. आता लढा अखेरपर्यंत. नोटिसा परत घेईपर्यंत बोलणी नाहीत. नेते पकडले गेले तरी घाबरू नका. प्रत्येकजण नेता बना. एकजूट हीच शक्ती.

६-६॥ ला इतर हॉस्पिटलांना नोटिसा. नोटिसा स्वीकारण्यास डॉक्टरांनी नकार दिला.त्या खोल्यांच्या दारावर डकवल्या गेल्या. कुत्सित हास्याच्या फवाऱ्यांनी या प्रकाराचे स्वागत.

डीन, कमिशनर, मंत्री महाशय यांच्या निदानाची चर्चा रंगू लागली. शेवटचे मत होते सायकियाट्रिस्टांचे.

अंधार पडू लागला तशा बातम्यावर बातम्या येऊन थडकू लागल्या. मने संतापू लागली. भीतीही वाढू लागली.

जे. जे. ला पोलिसांचा वेढा पडला.

के. ई. एम. भोवती बंदोबस्त वाढला. ट्रक्स, बसेस, कुत्रे पकडण्याच्या गाड्या आवारात आणून ठेवल्या गेल्या—डॉक्टर्सना हलवायला.

बोलणी घडवून आणतो म्हणणाऱ्यांना दरवाजे दाखविण्यात आले.

मित्रही वाढू लागले. इंडियन मेडि-

कल असोसिएशनचे नेते, इन्शुअरन्स मेडिकल प्रॅक्टिशनर्सचे नेते. रात्री उशीरा के. ई. एम. ला सौ. अहिल्या रांगणेकर, नायरला श्री. प्रमोद नवलकर, जे. जे. ला श्री. मनोहर जोशी.

काही तरी घडणार असल्याचा संभव गडद होऊ लागला.

जहाल गटांना आवाज फुटू लागले. श्रोते मिळू लागले.

पोलिसांनी उचलून बाहेर फेकीपर्यंत आपण खोल्या सोडायच्या नाहीत.

बाहेर काढले की ताबडतोब सत्याग्रह. पकडून घ्यायचे.

सगळे कायदे आता मोडायचे.

(थोडी धक्काबुक्की चालेल.)

वर्तमान पत्रांना कळविण्यात आले.

प्रमुख नेत्यांनासुद्धा.

मानद डॉक्टरांचे वैयक्तिक निरोप आले. वॉर्डबॉइज व परिचारिकांचेसुद्धा. आम्ही तुमच्या बरोबर आहोत. असे काही घडलेच तर आम्हीही मैदानात उतरू.

जनतेच्या नेत्यांचे निरोप आले— मुंबईची जनता अन्याय सहन करीत नाही—लक्षात असू द्या.

मध्यरात्र जवळ आली तसतसा वातावरणातला तणाव वाढू लागला. स्प्रिंग्ज जास्त पिरगळल्या गेल्या. मने भडकू लागली. समजूतदार आवाज दडपले गेले. उरले ते फक्त करू वा मरू सूर. परिस्थिती स्फोटक बनली. उत्कंठा शिगेला पोचली.

बाराला पाच मिनिटे : स्टे ऑर्डर, स्टे ऑर्डर. खोल्या काढून घेण्याविरुद्ध कोर्टाकडून मनाई हुकूम मिळाला. वादळी ढगांना अवसान घातकी भोके पडली. स्फोट झालाच नाही. हा हा म्हणता मने शांत झाली. आनंदित झाली. जयघोष उमटले : पहिली फेरी जिंकली !

नाराजीचा सूर एखाद दुसराच.

निश्चित मनाने, कायदे कानू, कोर्ट कचेऱ्या, न्याय व लोकशाही यावर विश्वास ठेवीत थकलेली डॉक्टर मंडळी आपापल्या खोल्यात झोपी गेली.

□

१९ ऑगस्ट १९७३.

हा संप खच्ची करण्याचा एकच मार्ग होता. दुर्लक्ष, अनुल्लेख.

संप नेत्यांनी एक चूक केलीच होती, कोर्टातून स्टे ऑर्डर आणण्याची. सरकारी अत्याचार होऊच न देण्याची. स्वतःवर कायद्याचे बंधन घालून घेण्याची. स्वतःचे हात स्वतःच बांधण्याची.

पण चुका करण्यात सरकार कालच्या पोरांना हार कसे जाईल ? तो तर सरकारचाच मूळ मक्ता. स्टे ऑर्डर धुडकावून, कोर्टाची बेअदबी करीत, प्रमुख नागरिकांच्यादेखत, स्वतःविरुद्ध साक्षी पुरावे निर्माण करीत सरकारने पोलिसांच्या वेढ्यात डॉक्टरांना खोल्यातून अक्षरशः खेचून काढले व आवारात टाकून दिले. तेथून पकडून पोलीस ठाण्यात भरले.

मध्ययुगीन सामंतशाही विचारबुद्धीच्या मंत्रीमंडळाने त्याच प्रकारचे निर्णय घेतले. गेल्या सव्वीस वर्षातील तोंड देखली का होईना पण लोकशाही विसरले. स्वतःच करून ठेवलेले कायदे व

उभारलेली कोर्टे विसरले आणि चिडवून ठेवली जनता.

संप बारगळविण्याचा शेवटचा क्षण आता हातचा निसटला. कितीही चुकीच्या मार्गाने चालविला तरी आता संप यशस्वीच होणार होता. बारा तासात परिस्थिती अमूलाग्र बदलली होती. सरकारची उघडपणे बाजू घेणे, अन्यायाचे इतके नागवे समर्थन करणे कुणालाच जमणार नव्हते.

नीतीधैर्य बळावले, वज्रकठीण बनले ते याच क्षणी. या संपावर सर्वात मोठे उपकार केले महाराष्ट्र सरकारने.

सबंध वैद्यकीय व्यवसाय आता एकवटला. कधी न हलणारी आय. एम्. ए. खडबडून जागी झाली. सरकारला धमकावू लागली.

तीन वाजता सबंध वैद्यकीय व्यवसायाची आय. एम. ए. इमारतीत जाहीर सभा. प्रचंड चिडलेली. करू वा मरू सुराची. संपवाल्यांना हत्तीचे बळ आले.

IMA इमारत संपवाल्यांना सुपूर्द करण्यात आली. मार्डचे मुख्य ठाणे IMA च्या दुसऱ्या मजल्यावर थाटले गेले. आतापर्यंत नसलेली सुसूत्रता आता येणार होती. मार्ड आता पूर्णपणे एकवटली होती. लढ्याने अन अत्याचाराने सगळे मतभेद सांधून टाकले.

सरकारचा आडमुठेपणा मात्र संपत नव्हता. संप लांबत चालला, चिघळत चालला. संपावरची कालची पोरे डावपेचात तरबेज होऊ लागली. लढ्याची दीक्षा घेऊ लागली.

मनाई हुकूमामुळे प्रकरण न्यायप्रविष्ट झालेच होते. डॉक्टरांनी रिस्टोरेशन ऑर्डर मिळवली. सरकारचा त्यावर मनाई हुकूम.

न्यायालयातील नाटक आता रंगू लागले. सरकारचा हा एकमेव विजय. सात-आठ दिवस संपवाल्यांना त्यांनी कोर्टात अडकवले. कोर्टातील केस ऐकण्यात त्यांचा बहुमूल्य वेळ फुकट जाऊ लागला. खेळी हातातून निसटू लागली. अन् असे होतेय हे मात्र जाणवले उशीरा. तारखावर तारखा मिळू लागल्या अन् निर्णय मात्र लांबणीवर पडू लागला तेव्हाच.

पण हेही संपवाल्यांना शहाणपणच शिकविणार होते. जीवनभराचा अनुभव या नवशिक्यांना मिळत होता. सत्ताधाऱ्यांना कायदा, न्याय, लोकशाही वगैरे वल्गनांची पर्वा किती असते हे त्यांना समजलेच होते. आता न्याय मिळविण्यातील अडचणी अन् न्यायालयांचे स्वरूप व बांधिलकी.

हळू हळू सत्य समोर येऊ लागले. न्याय रस्त्यावर मिळतो, लढ्यातूनच. कोर्टकचेऱ्या, विधीमंडळे, मंत्र्यांचे बंगले सारे कुचकामी असतात.

जहालांना पुन्हा आवाज फुटू लागले. यावेळी गंभीरपणे ते ऐकले गेले. जनतेपाशी जाण्याची जरूरही समजून आली.

काही व्याख्या बदलू लागल्या. डॉक्टर : एक अतिकुशल व कसबी कामगार, अप्रत्यक्ष उत्पादक. पांढरपेशा बुद्धिजीवी वगैरे मानणे निरुपयोगी. लढायचे तर कामगारासारखे, बाबू लोकांसारखे नव्हे वगैरे.

इतरही जाणीवा जागू लागल्या. सरकार इतके गप्प का? ही हॉस्पिटल्स गरिबांची म्हणून? दिल्लीत केवळ दोन दिवसात हादरणारे सरकार मुंबईत इतक्या गुर्मीत का? हितसंबंधियांची काळजी खाजगी इस्पितळे घेताहेत म्हणून?

आपला पगार मुळातच इतका कमी का? आपल्या इस्पितळात औषधे इतकी कमी का? अंदाजपत्रकाचा किती हिस्सा वैद्यकीय मदतीवर खर्च होतोय? इतका कमी का? जनतेच्या आरोग्याची सरकारला पर्वा का नाही? केवळ प्रतिष्ठेसाठी ग्रामीण भागातले इतके डॉक्टर सरकार इथे आणते — ग्रामीण जनतेचा हा विश्वासघातच, तो सहन का केला जातो? या सरकारला जाब कोण विचारणार अन् कसा?

मुळात हे सरकारच कुणाचे? जनतेचे का इतर कुणाचे?

तीन आठवड्याच्या स्वानुभवातून बरेच काही शिकले गेले, शिकावे लागले.

मार्ड तशी अत्यंत तरुण संघटना. अपरिपक्व, विस्कळीत. मतैक्य असणे कठीणच. बरेचसे अराजकीय. थोडे डावे, काही उजवे.

लढा संपविण्याचा, जास्तीतजास्त बोथट करण्याचा आतूनही प्रयत्न कळत, नकळत झालाच. पण या शक्तींना विजय मिळू शकला असता फक्त संप सुरू होण्यापूर्वी. आता वेळ टळून गेली होती.

संप, लढा ही एक महान शक्ती आहे. जनतेला ती शिक्षण देते, नसलेल्यांना नेते बनवते, असलेल्यांना उचलून फकून देते. इतिहासाच्या बरोबर कोण अन् विरुद्ध कोण इतकीच केवळ कसोटी ती मानते.

◻

I. M. A. इमारत. दुसरा मजला. कृती समितीच्या सततच्या बैठकी. कार्यकारी उपसमितीच्या सुद्धा. घणाणला फोन.

लढा चालूच राहिला.

वाटाघाटींचे गुऱ्हाळसुद्धा.

कोण कोण मध्ये पडले.

पण काहीच जमत नव्हते. आता जमणार होते फक्त मुद्यावर. समित्या, पोकळ आश्वासने, विश्वासाची आवाहने एका मागोमाग एक उकिरड्यावर गेले.

कडवटपणा व तेढ फक्त वाढत राहिली.

नव-नवे डावपेच चोखाळले जात होते. रूग्ण सेवा अडू नये म्हणून पर्यायी जनता दवाखाने शहरभर उघडले गेले. मानद डॉक्टर संपावर जाताच त्यात चिकित्सा केंद्रांची भर पडली. आणि शेवटी काही खाटा मिळवून चक्क पर्यायी रूग्णालये उघडली गेली.

ऑल इंडिया स्टुडन्टस व यूथ फेडरेशन यांनी सहानुभूतीदर्शक लाक्षणिक उपोषण करायचे ठरवले. त्यांच्याबरोबर काही संपवाले डॉक्टर बसणार होते — पण हे बेकायदा नाही ना? कुणी वकिलांना विचारलेय का? अन् बसायचे कुठे? रस्त्यावरच? पोलिस काही करणार नाहीत ना? — पहिल्या वेळचे प्रश्न पुढे साफ विसरले गेले.

उत्साहाने कार्यकर्ते पुढे येऊ लागले. पोलीस उरले फक्त टिंगलीचा एक विषय.

२९ ऑगस्टला वैद्यकीय व्यवसायाने लाक्षणिक संप केला. प्रचंड मूक मोर्चा निघाला. सरकारने रस्त्यावर काढलेल्या डॉक्टरांनी आता रस्ता घट्ट धरून ठेवला होता.

३० ऑगस्टला मुंबईच्या विद्यार्थ्यांनी लाक्षणिक हरताळ पाडला. कॉलेजेस बंद झाली. याही पावलाबद्दल सुरवातीला धास्तीच होती; पण काहीजण पुढे आले. कॉलेजातून फिरले. आभार मानीत. आपली भूमिका समजावून देत.

जनता संपर्काचे काम नीट झाले नव्हते, ते आता जोरात सुरू झाले. हजारो पत्रके मुंबईच्या रस्त्यावर वाटली गेली.

मथळे झळकविणाऱ्या प्रचंड सभा कुवती पलीकडच्या होत्या. म्हणून सुरू झाले छोट्या पण प्रातिनिधिक सभांचे सत्र. विद्यार्थ्यांच्या, प्रोफेसरांच्या, कामगारांच्या आणि कामगार नेत्यांच्या.

आणि अर्थात जनतेच्या निर्वाचित प्रतिनिधींच्या. नगरसेवकांना सहानुभूति होती पण मने गोंधळलेली होती. आयुक्तांच्या प्रचाराला सुद्धा ते बळी पडत होते भाबडेपणाने. सन्मान्य अपवाद अर्थातच होते.

आमदारांचा अनुभव मात्र वाईट आला. विरोधी पक्षांनी पूर्ण साथ दिली पण सत्ताधारी आमदारांनी मात्र सभेला बोलवायला गेलेल्यांना—यात महिला डॉक्टरही होत्या—साधी सभ्यतेची सुद्धा वागणूक दिली नाही. लोकशाहीचे पितळ जास्तच उघडे पडले.

सहानुभूती असणारे जबाबदार नेते आमंत्रणांची वाट पाहत बसले. पेशवाईच्या सरदारांची आठवण करून देत.

सगळ्यांच्या मनात होती तडजोड, कुठल्याही प्रकारची. संप, एक हत्यार जागृतीचे हा दृष्टीकोण बाळगला फक्त डाव्या पक्षांनी, आणि शिवसेनेने.

शेवटी लढा रस्त्यात उतरविण्याचा चंग बांधण्यात आला. ट्रेड युनियन्स व मार्ड यांची एक संयुक्त समिती स्थापन झाली. आणि गिरण्या कारखान्यांवर सुरू झाल्या गेट मिटींग्ज.

हा साधा सरळ न्यायासाठी लढा आहे. एकच प्रश्न. काम तितके वेतन. तुमचा आमचा सर्वांचाच हा यक्षप्रश्न. आम्हाला साथ द्या.

कामगारांच्या प्रतिसादाने नवा हुरूप आला. सिटु, आयटक, सर्व श्रमिक संघ, हिंद मजदूर पंचायत यांच्या पाठिंब्याने विश्वास दुणावला.

काही नव्या जाणिवा जाग्या होऊ लागल्या. सुशिक्षित मध्यमवर्ग वागतोय कोमटपणाने आणि खुल्या दिलाने साथ देतोय तो हा कामगार. खरा दोस्त कोण? आर्थिक, सामाजिक व भावनिक दृष्ट्या जवळचा मध्यमवर्ग की हातावर पोट व खांद्यावर बावटा असा हा कामगार? आणि त्याचा पाठिंबा का? आपण लढतो एवढ्याच साठी, किंमतीची अपेक्षा न ठेवता!

इतके अर्थातच सगळे सोपे नव्हते. पत्रके वाटायला फोर्ट, चर्चगेट, कुलाबा

वाळकेश्वर बहुतेकांना प्रिय होते. परळ-लालबाग जरा कठीणच पडायचे. पण एक गट मनाने तयार होता, खंबीर होता, कामगाराचे ऋण मानीत होता. त्याच्या बरोबरीने इतर खेचले गेले.

स्वत:चे हस्तिदंती मनोरे सोडायला नाही म्हटले तरी डॉक्टर नाखूष होतेच. पण परिस्थितीने दुसरा मार्गच ठेवला नव्हता. लढा, प्रत्येक शस्त्रानिशी अन प्रत्येक आघाडीवर इतकाच काय तो उपाय होता.

सूड बुद्धीने पेटून उठलेल्या आयुक्तांनी याच काळात, मुद्दामहून, पूर्वी रद्द केलेल्या ट्यूटर्सच्या ६६ नव्या जागा निर्माण केल्या. हा अप्रत्यक्ष सूड व संप-फोडेपणा या भूमिकेवरून मार्डने या जागा भरण्याला विरोध केला. वैध मार्गांनी काहीच होत नाही म्हटल्यावर मुलाखतीला जाणाऱ्यांना अडविण्याचे ठरले. काही जाहीर न करता संप-वाल्यांचा पालिकेला गराडा पडला. पाचही दरवाजे रोखले गेले, कॉरिडॉर्स व जिने सुद्धा. आयुक्त व अधिष्ठाते जळ-फळले पण निरुपायाने हात चोळीत परत गेले. इतका शांत व यशस्वी घेराओ विरळाच होता.

वाढत्या जाणिवा, कामगारांचा वाढता पाठिंबा, कॉर्पोरेशनचा घेराओ, संप पसरण्याची भीती–अखिल भारतीय संघटनेची स्थापना, नर्सेस व वॉर्डबॉय-जच्या धमक्या, केंद्राचा दट्ट्या, बेअदबीचा खटला–सरकारच्या डोक्यावरच्या टांगत्या तरवारी ठरल्या.

प्रतिष्ठेची ताठर भूमिका सोडून नाक मुठीत धरून मंत्री वाटाघाटीच्या टेबलावर आले. अनेक दिवस रेंगाळ-लेल्या, चिघळलेल्या वाटाघाटी एका दिवसात आटपल्या. संप मिटला. मागण्या नव्याच प्रमाणात मान्य होऊन, सरकारने डॉक्टरांची तोंडी का होईना पण माफी मागितली.

संप संपला. कुणी जिंकले, कुणी हरले. डॉक्टर्स कामावर गेले. इस्पितळे सुरळीत सुरू झाली. प्रश्न हा की या पांढरपेशांच्या पुचाट पोटभरू संपाबद्दल इतकी आस्था सगळ्यांना का वाटली? एकही दिवस ते पहिल्या पानावरून हटले का नाहीत? पुरोगामी म्हणव-णाऱ्या संघटनांनी यांना मदत का केली? एका विशिष्ट, खास सवलती मागणाऱ्या वर्गाचा जनता विरोधी लढा असे न मानता याला जनतेचाच न्याय्य लढा असे का मानले?

अनेकांना हे समजलेच नाही. विशेषत: सुशिक्षित मध्यमवर्गीयांना.

संपाचे महत्त्व तसे फार मर्यादित होते. पण होते.

गेली काही वर्षे प्रत्येक संप अमानुष-पणे नमविणारे सरकार, मी करीन ती पूर्व दिशा या गुर्मीत असलेले सरकार या वेळी झुकले. जर काही उथळ तरुण हे करू शकले तर कामगार हे नक्कीच करू शकतील हा गेलेला आत्मविश्वास कामगार चळवळीला पुन्हा मिळाला.

बुद्धिजीवी वर्गाला तर हा लढा फारच जवळचा वाटावा. हा संप चिरडला गेला असता तर पुढची काही वर्षे बुद्धिजीवी वर्गाचा लढा उभाच

पृष्ठ ४६ वर

# कलकत्ता मेल

सौ. तारा पंडित

## कलकत्यातील रंगमंचावर शांतता! (कोर्ट चालू आहे)

'चोप्! आॅदालत चोलछे!'... ह्या नाटकाच्या प्रयोगाला जाऊन बसले तेव्हा मूळ मराठी नाट्यप्रयोग तर पाहिलेला नव्हता पण नाटक देखील वाचलेलं नव्हतं. त्यामुळे मराठी व बंगाली प्रयोगांमधील तारतम्य भाव अजमावणं अशक्य होतं. एक बंगाली नाट्यप्रयोग म्हणूनच ते नाटक पाहिलं आणि आवडलंही. कारण श्री. शंभु मित्र ह्या विख्यात दिग्दर्शकाने प्रयोग सादर केला होता आणि आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना तृप्त करून सोडणाऱ्या तृप्ती मित्र–शंभु मित्रांच्या पत्नी ह्यांनी नायिकेची भूमिका उत्तम वठवली होती. तरीपण अगदी अलीकडेच शंभु मित्रांची गाठ घेतली तेव्हा बोलता बोलता ते म्हणाले–

'मी हे नाटक बसवलं पण माझं स्वत:चं समाधान झालं नाही. वास्तविक मुंबईला जाऊन मराठी प्रयोग पाहून आल्यानंतरच मी हे नाटक बसवलं होतं. पण अरविंद देशपांडेसारखं दिग्दर्शन मला जमलं नाही आणि बेणारेची भूमिका करणाऱ्या सुलभा देशपांडेसमोर आमच्या तृप्तीचा अभिनय मला फिकाच वाटला.'

हे ऐकून मला कमालीचं आश्चर्य वाटलं. एका श्रेष्ठ दर्जाच्या नट-दिग्दर्शकाने एवढी प्रांजळ कबुली द्यावी! पण ह्यातच त्यांच्या मनाचा मोठेपणा व्यक्त होतो. ह्याउलट सामान्य प्रतीच्या नटसंचामध्ये केवढा अहंभाव असतो त्याचा प्रत्यय आला, जेव्हा अगदी अलीकडेच ह्या नाटकाचा मराठी प्रयोग पाहात असताना हिंदी–इंग्रजी प्रयोग करणारांनी आपली अहंभावी मते व्यक्त केली तेव्हा!

मराठी प्रयोग सादर करणारे नवोदित हौशी कलाकार होते तरी त्यांनी अत्यंत मेहनत घेऊन, सर्व प्रकारच्या अडचणींना हसतमुखाने तोंड देऊन, अत्यंत कठीण असणारा हा नाट्यप्रयोग मराठी प्रेक्षकांसमोर सादर केला हेच मुळी कौतुकास्पद आहे. ह्या प्रयोगाला प्राॅम्प्टिंग अजिबात नव्हते हे आणखी एक वैशिष्ट्य! प्रत्येक नटाने आपापल्या परी अभिनय उत्तम वठविण्याची पराकाष्ठा केली. हे सारे कलाकार बृहन्महाराष्ट्रात असल्याकारणाने एकाही नटाने मुंबईला होणारा मराठी नाट्यप्रयोग पाहिलेला नव्हता. प्रत्येकाचा अभिनय त्या दृष्टीने अगदी ओरिजिनल होता. आपली भूमिका नीट समजून घेऊन, आपला अभिनय बुद्धीच्या निकषावर घासून व दिग्दर्शकाच्या

सूचना लक्षात घेऊन प्रत्येक पात्राची हालचाल होत होती. नायिकेने बेणारेंची भूमिका मूर्तिमंत साकार केली हे आवर्जून सांगावेसे वाटते.

ह्या प्रयोगासाठी ह्याच नाटकाचे हिंदी व इंग्रजी प्रयोग करणाऱ्या मंडळींना मुद्दाम निमंत्रण धाडले होते. श्री. शंभु मित्रांनाहीं खास आमंत्रण होते. पण काही अडचण निर्माण झाल्यामुळे ते येऊ शकले नाहीत. इंग्रजी प्रयोग करणारे मधूनच उठून निघून गेले. तुमची भाषा आम्हाला कळत नाही व आमचाच प्रयोग अधिक चांगला होतो हे कारण त्यांनी पुढे केले. हिंदी प्रयोगात सौ. काशीकरांची भूमिका करणारी मुलगी (वयाने प्रौढ व अंगाने जाडजूड) माझ्याच शेजारी बसली होती. मध्येच मला म्हणाली– 'तुम्ही आमचा हिंदी प्रयोग पाहिलात? नाही ना? मग अवश्य बघा. आम्हीसुद्धा नवोदित कलाकारच आहोत. पण आमचा प्रयोग कित्येक पटींनी अधिक चांगला होतो.'

येथील नटसंचाने तर बंगाली नाट्यप्रयोग पाहिला नव्हताच पण प्रेक्षकांमध्येही बंगाली प्रयोग पाहिलेली व्यक्ती आढळली नाही. पहिल्या दोन अंकातील अभिनय पाहिल्यावर मला असे वाटले की, बंगाली प्रयोगातील सौ. काशीकरांची भूमिका अधिक उठावदार असावी. तसे मी सहज जवळ बसलेल्या एका विशीतल्या मुलीला म्हटलं, तेव्हा ती म्हणाली– 'असं कसं शक्य आहे? मराठीत मूळ नाटक असताना त्यातल्या भूमिकेपेक्षा अनुवादित बंगाली प्रयोगातील भूमिका अधिक चांगली कशी वठू शकते?' मी तिला समजावून सांगितलं की, 'अग, अभिनय तो अभिनय. अभिनयाला भाषेचं बंधन नाही. अभिनय प्रमुख व भाषा ही गौण असते.' तिला हे पटलं असावं.

ह्या नाटकाच्या प्रयोगाबाबत प्रेक्षकांमधून नाना तऱ्हेचे साद-पडसाद, मतमतांतरे कानावर आदळत होती. इथपासून की 'ह्या असल्या विचित्र नाटकाची निवड केली हीच पहिली चूक' प्रत्येक अंकानंतर रंगपटात जाऊन नटसंचाचं अभिनंदन करून प्रेक्षागृहाच्या बाहेर आल्याबरोबर विपरीत उद्‌गार काढणारेही काही महाभाग आढळले. कुणी म्हणालं– आमच्या तर डोक्यावरून गेलं. कुणी म्हणालं– आमच्या डोक्यापर्यंत देखील ते पोचलं नाही; पायाखालूनच वाळूसारखं निसटून गेलं. (इतकं ते नाटक निकृष्ट आहे हा त्या म्हणण्यातला उपरोधिक सूर.) कुणी म्हणालं– त्या हिरॉईनबद्दल जरादेखील सिंपथी वाटत नाही. यावर एकाचे भाष्य असे– 'कशी वाटेल सिंपथी? उच्चभ्रू समाजातल्या लोकांना मध्यमवर्गीयांबद्दल सिंपथी वाटणार कशी? स्टेजवर वावरणारी पात्रं सगळी मध्यमवर्गीय आहेत.' यावर कडी केली आणखी एका भाष्याने– 'तसं नव्हे. तुम्ही कोणत्याही समाजात वावरत असला तरी तुमचं मन तितकं संवेदनाक्षम असेल तरच तुम्ही त्या पात्रांशी समरस होऊ शकाल.'

आणखी एक असेच संभाषण.

'का हो, चवदा भाषांत भाषांतर व्हावं असं काय आहे हो ह्या नाटकात ?'

'अहो, काहीतरी असलंच पाहिजे ना, जे तुम्हा-आम्हाला कळलेलं नाही. चौदा भाषात अनुवाद करायला लोक वेडे का आहेत ?'

'आपल्याला नाही बुवा कळत ह्यातलं काही.'

'अहो, तुम्ही डॉ. श्रीराम लागू किंवा अरविंद देशपांडे ह्याचे लेख वाचलेत का ह्या नाटकाच्या संदर्भात ? नाही ना ? मग ते अगोदर वाचा म्हणजे आपोआप नाटक कळेल तुम्हाला.'

कुणी म्हणालं– 'मी मुंबईला ह्या नाटकाचा प्रयोग कसलेल्या कलाकारांनी सादर केलेला पाहिला आहे. आजचा हा प्रयोग त्या तोडीचा करण्याचा कसोशीने प्रयत्न केला गेला आहे असं माझं मत आहे.'

ही तऱ्हतऱ्हेची मतमतांतरे ऐकून मला आठवण झाली, ह्यूगो शिमेल ह्या जर्मन लेखकाने म्हटले आहे–

The accumulation of various interpretations results in the full meaning which a work of art achieves for later generations. Even when later generations reject it completely, this too is a form of interpretation.

हाच लेखक पुढे म्हणतो–

Works of art are challenges. We do not explain them; we try to come to terms with them. In so doing, we subject them to our own aims and ambitions and transfer on to them meanings that originate in our own ways of life and habits of thought.

प्रस्तुत नाटक म्हणजे एक monumental piece of Art आहे आणि त्याचे विविध प्रयोग पाहताना we can experience it only as human destiny, human emotion and passion. हे ह्यूगो शिमेल म्हणतो त्याप्रमाणे खरं नव्हे काय ?

कलेचं विश्लेषण करणाऱ्या ह्या जर्मन माणसाचीच वचनं उद्धृत करण्याचं मुख्य कारण म्हणजे जर्मन लोक हे अत्यंत नाटकवेडे आहेत. जर्मनीतील एखाद्या लहानशा खेड्यातदेखील इतर काही गैरसोयी आढळतील पण नाटकाचं थिएटर तिथे हटकून दिसेल. ह्या नाट्य-प्रेमामुळे अभिनयकलेचं रसग्रहण जर्मन लोक उत्तम प्रकारे करू शकतात व अधिकारवाणीने ह्या कलेविषयी बोलू शकतात.

● ● ●

# मध्यवर्ती दुष्काळ निवारण समिती आणि

# नरुभाऊ लिमये

गेल्या वर्षीच्या महाभयानक दुष्काळातून महाराष्ट्र आता बाहेर पडत आहे. अजून त्या होरपळीच्या जखमा कायम आहेत. चटके संपलेले नाहीत. तरीही यंदाचे पीक आता हाती लागेल आणि तुलनेने गेल्या वर्षीपेक्षा जीवन सुखी होईल असे म्हणण्यास हरकत नाही.

या संग्रामात कोण कसे वागले व कोणी कसे वागावे या संदर्भात मध्यवर्ती दुष्काळ निवारण समितीचा एक प्रासंगिक उल्लेख माणूसमध्ये आला. त्याला अनुसरून या समितीचे कार्य काय, असा प्रश्न मी विचारला. माझे मित्र व समितीतील एक ज्येष्ठ सदस्य श्री. खोले यांनी प्रत्युत्तर दिले की, समितीचा एक सदस्य म्हणून मीच ते कार्य जनतेसमोर मांडावयास हवे !

आता जरा शांत वातावरणात माझा प्रश्न व त्याचे उत्तर मी शोधू पहात आहे. हे उत्तर समितीचे अधिकृत नाही. तसेच मी आता त्या समितीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्यामुळे मला माझे विचार मोकळेपणाने मांडता येतील. त्याची चर्चा होणे गरजेचे आहे असे मला वाटते.

माझ्या समजुतीप्रमाणे ही समिती म्हणजे पूर्वी डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी स्थापन केलेल्या सर्व पक्षीय दुष्काळ निवारण समितीचे पुनरुज्जीवन होते. संकटकालात प्रासंगिक मदत काम करण्यास अशा संस्थांची गरज असते. विशेषत: दैनंदिन राजकारण, पक्षभेद, पक्षप्रेम बाजूस ठेवून काम करू इच्छिणाऱ्या मंडळींना अशा एखाद्या यंत्रणेचे महत्त्व वाटते. कामही चांगले होऊ शकते. याच भावनेने मी प्रा. दांडेकर यांच्या नेतृत्वाखालच्या समितीत आपणहून अनाहूतपणे एक दिवस गेलो. माझे तेथे स्वागतही झाले. माझ्या मताप्रमाणे कार्यसिद्धीसाठी काही प्रयत्नही मी केले. त्याचे यशापयश हा प्रश्न निराळा. आता ही समिती नैमित्तिक कामाऐवजी नित्य, कायम स्वरूपाचे काही काम अंगावर घेत आहे, पण ते काम समितीच्या, माझ्या कल्पनेच्या कक्षेत बसणारे नाही असे वाटून मी विनयपूर्वक त्यातून दूर झालो. नव्या कामाचे स्वरूप आंदोलना-

त्मक ठरेल असे वाटते.

दुष्काळ, महापूर, भूकंपासारख्या आपत्ती देशावर येतात तेव्हा सारा समाज त्या आपत्तीशी झगडण्याला सिद्ध होतो. त्यात पहिली जबाबदारी देशाच्या शासनावर येऊन पडते. त्याचप्रमाणे समाजातल्या दयाबुद्धीला ते आवाहन ठरते आणि ज्याला जे वाटेल त्या पद्धतीने संकटाशी झगडण्यास तो सिद्ध होतो. पुण्याला परिचित अशा पानशेत संकटाच्या वेळी सारा महाराष्ट्र पुण्याच्या मदतीला धावून आला. कोयनाभूकंपाच्या वेळी तेच झाले. जेवणाचे पदार्थ इतके येऊ लागले की, मदतीचे स्वरूप बदला असे सांगावे लागले. पण प्राथमिक धक्क्याचा परिणाम जरासा कमी झाला की मदतीचा ओघही मंदावतो. जी मदत येते तिचे वाटप योजनापूर्ण होत नाही. पहिल्या धक्क्यातून बाहेर पडलेले लोक हळूहळू मागे सरतात. मग मतलबी मंडळी त्या संकटाचे भांडवल करून आपला स्वार्थ साधण्याची शक्यता असते. तसेच संकट कोसळल्यानंतर मदतकार्याला वेग येण्यासही काही काळ लागतो. मग ते काम सरकारी यंत्रणेमार्फत असो की सार्वजनिक सेवाबुद्धीने हाती घेतलेले असो.

अशा वेळी एखादी यंत्रणा कायमची उभी, पण प्रत्यक्ष संकटाच्या वेळीच काम करणारी यंत्रणा गरजेची असते. प्रा. दांडेकर यांची (डॉ. गाडगीळांची) समिति ही त्या दृष्टीने म्हटली तर कायम स्वरुपाची, पण संकटकालात प्रथम पाऊल टाकणारी समिती असेल अशी माझी कल्पना. राजकारण हा जणू दुसरा स्वभाव बनलेल्या महाराष्ट्राला तर अशा अपक्ष वा खऱ्या अर्थाने सर्वपक्षीय समितीची फार गरज. कै. गाडगीळांचा शब्द हा समाजात व त्याचप्रमाणे सरकारात मोठे वजन मिळविणारा शब्द होता. सरकारी यंत्रणेचे सर्वच काही त्यांना पसंत पडत असे असे नाही. पण जी गाडी लोकमताने निर्माण केली ती सदर्न मराठा असो की तुफानमेल असो, तिच्यातूनच प्रवास करावयाचा आहे, मग दरवेळी टीकेचा आसूड, नापसंतीचा स्वर उच्चारून गाडीवानाला नाउमेद करता कामा नये, ही दृष्टी गाडगीळसाहेबांची होती असे मला वाटते. त्याच दृष्टीने या सर्वपक्षीय समितीच्या कामाला मोल आणि महत्त्व होते म्हणून आपण तेथे असावे ही माझी दृष्टी.

गेल्या वर्षीच्या दुष्काळात कुणाला कल्पना नव्हती इतकी मदतीची गरज लागली. आम्ही हे अगोदरच ओळखले होते असे सांगणारी अनेक तज्ज्ञ मंडळी आज I said so म्हणून स्वतःचे समाधान करून घेत असली तरी गेल्या दिवाळीच्या सुमारास एकदोन पाऊस पडले तर संकट सुसह्य होईल अशी आशावादी नजर सर्वांची होती, हे नाकबूल करण्यात अर्थ नाही. जसजशी ती आशा मावळली तसतसे दुष्काळाचे स्वरूप भयानक ठरले. पन्नास लाख लोकांना पोटासाठी खडी फोडावी

लागली. शासन मेटाकुटीला आले. दिल्लीपासून मुंबईपर्यंत आला दिवस मागे लोटावा कसा या चिंतेत शासनाधिकारी होते.

अशा स्थितीत एखाद्या मध्यवर्ती समितीला फार मोठे काम करता आले असते. सरकारच्या प्रयत्नांना पूरक असे काम करण्याची गरज होती.ती समिती सरकार निर्मित असली तर तिला एका दृष्टीने मर्यादा पडतात. दुसऱ्या दृष्टीने शक्ती–साधने मिळतात. पण खऱ्या अर्थाने लोकांमधून समितीची यंत्रणा निर्माण झाली तरच शक्ती व संधी दोन्ही त्या समितीला प्राप्त होतात. मला आशा वाटली की मध्यवर्ती दुष्काळ निवारण समिती त्या उंचीवर जाईल.

त्या समितीकडून खूप मोठा फंड उभा केला जावा अशी माझी कल्पना. समितीने एखाद्या दुष्काळी गावाच्या पातळी पासून तो मुख्यमंत्र्यापर्यंत संपर्क ठेवावा, समाजातले धनिक, सेवाभावी एकत्र करावे. त्यांच्या विस्कळित प्रयत्नांना एका सूत्रात आणावे, त्यासाठी स्वयंसेवक वृत्तीची माणसे जमवावी, साधने उपलब्ध करून द्यावी आणि खऱ्या अर्थाने मध्यवर्ती कचेरीत बसून एखादा रेडक्रॉस संघटनेचा प्रमुख जेथे जे कमी पडेल तेथे ते पोचविणेस सज्ज असावा तसे या समितीचे (माझ्या मनातले) स्वरूप. मग ती मदत पोचविताना सरकारपासून ग्रामपंचायतीपर्यंत वा परदेशी मदतीपासून तो देशाच्या कानाकोपऱ्यातल्या सहानुभूतीला आवाहन करण्याचे काम या समितीला करता आले असते. ते तिचे काम अशी माझी समजूत. देशात एका भागात दुष्काळ तर दुसऱ्या भागात मुबलक धान्य अशी अवस्था होती. जो तो प्रांत आपले आपल्या हाती ठेवून सौदा करीत होता. सरकारी हुकूम दुबळे बनत होते कारण ती लोकशाहीतली शक्ती होती. हुकूमशाही सत्ता नव्हती ! केंद्र सरकारने तशी सत्ता का वापरली नाही ? असा प्रश्न विचारून टीकाकार टवऱ्यांचा खेळ खेळू शकतील. पण त्याने प्रश्नाची सोडवणूक होणार नव्हती. अशावेळी बिनसरकारी सर्वपक्षीय प्रयत्न झाले असते तर भीड मुर्वतीखातर पंजाब, हरियाना, मद्रास, आंध्रातून भरपूर धान्य येऊ शकले असते. माणशी दीड-दोन किलोची उपासमार थांबली असती.

मध्यवर्ती समितीने हे काम अंगावर घेण्याची गरज होती. कारण तो मार्ग सरकारला खुला नव्हता. समितीने हे करण्या ऐवजी दरमहा एक ठराव करून सरकारने बारा किलो धान्य माणशी दिलेच पाहिजे अशी मागणी करण्यात समाधान मानले. आपले निरीक्षक नेमले पण त्यांनी पाठविलेली माहिती दुष्काळी जिल्हा अधिकाऱ्यांकडे वा सचिवालयात नेऊन मार्ग शोधण्याचा प्रयत्न झाला नाही. कोठल्याही खेड्यात घडलेल्या गैरव्यवस्था, अपहार, जुलमाचे खापर 'सरकार' नामे शक्तीच्या डोक्यावर फोडून समिती मोकळी झाली. शासनातले बहुसंख्य अधिकारी अत्यंत कार्यक्षम आणि दहावीस टक्के लोक

प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाण्याच्या वृत्तीचे निघाले! शासन त्याचा तात्काळ बंदोबस्त करू शकत नव्हते हे उघड आहे; पण जनशक्ती जागृत करून देखरेख समित्या तालुका पातळीवर निर्माण करण्याचे काम मध्यवर्ती समितीला करता आले असते. त्या ऐवजी विविध राजकीय पक्षाचे पुढारी महिन्याकाठी एकत्र जमून तीव्र शब्दातील ठराव करून समिती मोकळी होत असे.

आता तर खेड्यापाड्यातील भूहीन मजुरांना बिनदुष्काळी काळातही काम मिळवून देण्यासाठी सरकारची रोजगार हमी योजना राबविण्याचा दैनंदिन आग्रह धरण्यासाठी समिती काम करणार असे दिसते. ही रोजगार हमी योजना साऱ्या देशात महाराष्ट्र सरकारने प्रथम आखली. जेव्हा ही योजना जाहीर झाली तेव्हा दुष्काळी परिस्थिती नव्हती. या योजनेची मर्यादा केवळ ग्रामपंचायतीच्या कक्षेतली प्रायोगिक स्वरुपाची आहे. केवळ जो बेकार म्हणून कामास येईल त्याला जीवनवेतन देण्याची ही कल्पनाच नाही. खेड्याखेड्यातली ग्रामपंचायत अशी कामे उभी करू शकणार नाही. पण काही चार-दोन व्यक्ती कामच नाही म्हणून घरी चूल पेटणार नाही अशा अवस्थेत असतील त्यांना तात्पुरते काम व (खावटी) किमान वेतन ही या रोजगार हमीची मुळातली कल्पना. इतर ठिकाणी त्यांनी काम बघत रहावे ते मिळाले की तेथे कामास जावे, पण काहीच मिळाले नाही तर स्थानिक कामावर (कमी) मजुरीसाठी यावे ही या योजनेची बैठक आहे. नेमकी हीच गोष्ट समिती विसरली असे वाटते. शेती कामावर मजुरी मिळत असताना वा दहा-पाच मैलात इतर विकास कामे सुरू असताना या रोजगार हमी योजनेकडे लोकांना आकृष्ट करावे ही मुळी


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**

कल्पनाच नाही.

समितीतल्या राजकीय पक्षांना मात्र या योजनेचे स्वरूप विस्तारित करून शेतकरी विरुद्ध शेतमजूर अशा फळ्या निर्माण करण्याची इच्छा झाली. एका विशिष्ट गटाने त्या हेतूसाठी समितीत प्रभावीपणे वजन ठेवले. समिती प्रमुखाचे स्वभावगुण, दोष व सद्यःस्थितीबद्दलचे राग-लोभ अचूकपणे ओळखून त्यांनी राबविले. आपण या समितीसाठी तीस-पस्तीस लाख रुपये उभे करू असे भासविले. दुष्काळ निवारण एवढेच काम समितीचे नाही तर दुष्काळ निर्मूलन (बेकारी निर्मूलन ?) हे कार्यही समितीचे आहे असा घटनेत फरक करून घेतला आणि समितीचे नैमित्तिक कार्यक्षेत्र नित्याचे बनविले.

समितीत राजकारण शिरले असे कुणी म्हटल्याबरोबर श्री. दांडेकर संतापतात. सहाजिकच आहे, कारण त्यांना स्वतःला तेथे राजकारण यावेसे वाटत नाही. बैठकी नंतर आपण अंघोळ करावी आणि चर्चेत जे राजकीय कण अंगावर उडाले असतील ते धुऊन काढावे अशी त्यांची वृत्ती. पण कळत नकळत ते त्या राजकारणात ओढले गेले यात शंका नाही. सर्वात खेदाची गोष्ट म्हणजे अशा समितीचा सरकारी प्रयत्नांशी जो सततचा संपर्क कायम राखण्याची गरज होती ती या राजकीय फेरफारामुळे संपली. इतर खाजगी बिनसरकारी मदत समित्याबरोबर संपर्क साधून दुष्काळ निवारणाचे कामात सुसूत्रता आणावी तेही संपले. उरले ते दरमहा मासिक बैठक न चुकविता एक ठराव करणे, काही थोडीफार रक्कम कुणी मागितली तर पाठविणे आणि 'आम्ही सरकारला कसे शास्त्रीय पद्धतीने झोडले ?' या समाधानात मशगूल होणे, एवढेच कार्य समितीने केले. टीका, आसुडाचे काम आपण केले म्हणूनच शासन एवढे दक्ष राहिले असे आत्मसंतुष्टता व्यक्त करणारे बोल ही मंडळी काढतील. पण ते काम राजकीय पक्ष दररोज खऱ्याखोट्या माहितीवर करीतच होते. मग हा सर्वपक्षीय खटाटोप कशासाठी !

असो. हा विषय आता मागे पडला आहे. योग्य वेळी पुरेसा पाऊस पडल्याने लोक कामाला लागले आहेत. नाईक सरकारने जे काही केले त्याचा जमा-नावेचा तक्ता मांडला तर जमेची बाजू जास्त आहे हे कुणीही कबूल करील. पण अशा संकटाच्या वेळी समाजधुरिणांनी विधायक वृत्ती दाखवावी हा धडा ही समिती दाखवून देईल ही अपेक्षा मात्र फसली. म्हणून समितीबाबद हा लेख.

● ● ●

# गालो पर झुलपे न गिरा!



छिपनेवाले ! सापने आ—गाणे अखंड-पणे मनात वाजत होते आणि मी हैराण झालो होतो ! गाण्याचा मूळ अर्थ काही असो. माझ्या मनात त्याला निराळेच धुमारे फुटले होते आणि पाहता-पाहता अग्रांकुर आकाशात चढला होता. माझ्या मनातल्या कवितेला सूर सापडत होते आणि या गाण्याच्या अर्थाने त्या कवितेवर पालवीचे छत्र उभारले होते.

सुदूर, एकांतातून शिट्टी वाजत होती, आगगाडीची शिट्टी. धुक्यातून, सळ-सळत्या झाडांच्या कुजबुजण्यामधून तो आवाज मला ऐकू येत होता, जाणवत होता. मनासमोरचे ते चित्र व्यवहारा-तही पुसट होत नव्हते ! त्यातच मला

कवितेचा आकार दिसू लागला होता—

कूक्. आगगाडीची शिट्टी. ती रात्री वाजली. कोणा चोराच्या कानी ती पडली. तो दचकला—त्याला ती ऐकू आली—शूक् !

कोण्या गृहिणीची गाढ झोप चाळवली. तिला तोच आवाज कुकरच्या शिट्टीसारखा वाटला—

एका नवजात अर्भकाने त्या आवाजात आपला आवाज मिळविला—आणि तो आवाज पाहता पाहता पालटला—'कूक्' नव्हे, भूक !

एवढ्यावर माझी कविता थांबत नव्हती. त्या गृहिणीच्या आणि त्या बाळाच्या, ओळीमध्यभागातून एक आणखी एका ओळीचा कोंभ मला घुमारलेला दिसू लागला होता ! तेथून एक लहानशी पोरगी डोकावून माझ्याकडे पाहू लागली होती आणि मी बेचैन झालो होतो. सात-आठ वर्षांच्या त्या पोरीचे रूप कवितेत शोधू लागलो होतो; आणि खिदळणारी, दोन्ही हात (कचकड्याच्या रंगीत बांगड्यांनी

खलास ! तिचा आवाज जाणवत होता, ओठ हललेले दिसत होते, परंतु काचेपलीकडून दिसावे, तसे. शब्द काही कानी येत नव्हते, मनात फुटत नव्हते ! पाठीमागून येऊन अलगद डोळे झाकावेत, तशी ती अवखळ अलका मला चिडवीत होती. ती कवितेत होती, तिच्याखेरीज कविता पूर्ण होत नव्हती आणि मी दररोज तगमग करीत होतो. उगाच. आगगाडीच्या त्या 'कूक्'मध्ये तिचा आवाज मिसळत होता आणि मी त्याचे शब्द हुडकीत होतो.

डोक्यात तेच घेऊन हमरस्त्याकडे वळत वळत जाणाऱ्या त्या बाय्-लेन्वर त्या दिवशी जाऊन पोहोचलो आणि ठराविक कोपऱ्याकडे पहातच राहिलो. कविता पार गायब झाली आणि भीषण व्यवहार मला आ वासून गिळायला तिथे बसलेला स्पष्ट दिसू लागला.

शाबास ! मी मनोमन मान डोलावली. वाहवा ! असा असावा हुषार माणूस ! सावकाशपणे रक्त डोक्यात चढले आणि मी संतापत गेलो !

## अरुण इनामदार

भरलेले) कवितेच्या दाराच्या चौकटीवर रोवून माझ्याकडे पाहणारी, खालचा मधला दात पडलेली, फुले कोंबून बसविलेल्या वेण्या पुढे लोंबणारी, गळ्यात तसल्याच खोट्या पण चमकदार कचकड्याच्या मण्यांची माळ घातलेली ती कारटी मला विचारीत होती—

माझ्या मनात कोणीतरी उभे राहिले आणि त्याने खडाखड माझ्या थोबाडीत भडकावून दिल्या. शिव्यांची लाखोली वाहण्यास सुरुवात केली. 'आता पुढे व्हा !' मीच मला पुढे गर्जून म्हणालो, 'बघा नीट पुन: एकदा !'

कोरड्या घशाने आंवढा गिळीत, अपमानाने व लाजेने चूर होत मी पुढे

झालो आणि त्या कोपऱ्यात शोधू लागलो. परंतु छे !

छे ! तिथे युसफ मुळीच नव्हता ! माझ्या तोंडाला झकासपैकी पाने पुसून तो नाहीसा झाला होता ! तिथं आता शेजारच्या हॉटेलच्या गिऱ्हाइकांच्या सायकली उभ्या होत्या आणि त्यांच्या ओल्या चाकोऱ्या दूरपर्यंत पसरलेल्या दिसत होत्या. युसफ सकाळपासून इकडे फिरकलाच नव्हता !

मी मनोमन माझा अक्कलशून्यपणा निर्विवाद कबूल केला. वेड्यासारखा युसफवर विश्वास ठेवून बसलो होतो, त्याचे बरोबर प्रायश्चित त्याने मला दिले होते. 'असा व्यवहार करायचा नसतो–' कैक जणांनी शिकविलेला हा धडा आम्ही स्वतःला फार शहाणे समजून कानाआड केला होता आणि आज जणू या क्षुद्र युसफने कान पिरगाळून तोच मला व्यवस्थित समजावून दिला होता !

आता दात–ओठ चावून तरी काय उपयोग होता ? पंधरा दिवसांआधीच हा विचार करावयास हवा होता–एक मौल्यवान् चित्र युसफच्या ताब्यात देऊन बसलो होतो, तेव्हा !

युसफ, एक थर्डक्लास फ्रेमवाला. त्याचे काम काही फारसे नाव घेण्यासारखे नव्हते, परंतु त्याच्याकडच्या एका फ्रेमने मला खिळवून टाकले होते. मी स्वतः कोरीव कामवाला; एका गिऱ्हाईकाचे ते काम पत्करून मोकळा झालो होतो, आणि मला हवी तशी कोरीव डिझाईनची फ्रेम इतर हजार मोठाली दुकाने सोडून इथे मला गवसली होती !

त्या माझ्या गिऱ्हाईकाने ते चित्र मोठ्या विश्वासाने माझ्या हवाली केले होते. 'तुम्हीच त्याला चौकट घालून द्या !' तो खात्रीने म्हणाला होता, 'पैसे मी देईन. त्यात तुमचे कमिशनही ॲड करा !'

'हे झटकाफटकी होणार थोडेच ?' मी बेफिकिरीने विचारले.

'सवडीने होऊ द्या !' तो बोलला, 'मी कोठे काय म्हणतो ?'

मी हात झटकले. 'बघू जमले तर !' उत्तरलो, 'तोवर हे चित्र –'

'ते तुमच्याकडेच असू द्या. सुरक्षित ठेवा, म्हणजे झाले.' त्याने म्हटले, 'माझ्याकडे ते तेवढेच आहे, म्हणून म्हणतो. त्याला शोभेल, अशी फ्रेम पहा, तुम्ही घ्या आणि मला कळवा. एवढे कराच आमच्यासाठी. काय ?'

मी ते टाळणारच होतो. अशा चमत्कारिक कामांच्या बाबतीत ही नेहमीची रड असते. एखाद्याच्या मनात कोणती तरी वस्तु भरलेली असते; आम्ही जीव तोडून तसली चीज मिळवावी, अगर हाताने बनवून द्यावी. त्याला ती आवडतेही–परंतु त्या दरम्यान काहीतरी घडलेले असते आणि त्याला त्याचाही नाईलाज असतो ! चीज आपल्या घरात ! त्यापेक्षा टाळलेलेच काय वाईट ?

पण त्याने चलाखीने ते चित्र पुढे केले आणि मी नकार देण्याचे विसरलो. तोंड मिटून पाहत राहिलो आणि

आपले काम झालेच, अशा विश्वासाने तो निघून गेलाही. मी ते काम करणारच अशी त्याची आधीपासूनच खात्री होती की काय कोणास ठाऊक, परंतु जायच्या आधीं माझ्या असिस्टंटकडे रुपये पन्नास द्यावयाचीही खबरदारी त्याने घेतली होती !

ते चित्र त्याच्या बायकोचे होते. जीर्ण झालेले. त्याचे रंग जवळजवळ उडून गेलेच होते, परंतु रंगांच्या पलीकडल्या एका रंगाची मुक्त पखरण मात्र काळ त्या मुद्रेवरून पुसू शकला नव्हता. टिपू शकला नव्हता. कदाचित कधीही टिपू शकणार नव्हता.

चित्रातली ती बाई फार फार जिवंत दिसत होती. वयाचा अंदाज मला येत नाही. त्याची जरूरही नाही. आम्ही वय म्हणतो पस्तीस, असते–जाऊ द्या ! खरोखर त्या चित्राकडे पाहताना इतर विचारच माझ्या मनात आला नाही. एका निर्व्याज स्मिताने तिची मुद्रा तेजाळून गेली होती. खरेच, निर्मळ हास्याने राक्षसाची मुद्राही गोड दिसून जाते ! बाई फार रुपवती नसावी. विरूपिनीही नव्हती. परंतु हे सारे विचार त्या तिच्या हास्याने पार पळवून लावले होते, आणि मी त्या स्मिताच्या प्रकाशाने नवनीतासारखा माखून गेलो होतो. काळाच्या पटाआड गेलेली ती बाई जणू याक्षणी माझ्यासमोर आली होती–

–छे ! समोर कोठली ? त्या भव्य भरजरी पटाआड तिची मूर्ती जाणवत होती. काळाचा पट किंचित सरकवून ती खालच्या मानेने म्हणत होती, 'कराच काम एवढे ! कराल ?'

–आणि त्याच्यापुढेही ती पुटपुटली होती, 'पाहू या !'

अगदी तिच्या नवऱ्यासारख्याच विश्वासाने जणू त्या चित्रातील बाईने ते काम माझ्यावर सोपविले होते आणि माझी परीक्षा 'पाहूया !' म्हणून पुन्हा हलकेच बाई त्या चित्रात जाऊन बसली होती !

हाती धरून पतंग मुद्दाम वर–उंच उडवावा, तसा मी बाहेर पडलो. कोणी तरी 'वाला'–दुकान गाठले. दुकान कसले, दुष्प्राप्य वस्तूंचे ते अजायबघरच होते. माझी तिथे नित्य ऊठबस होती. पेयांचे कपामागून कप रिकामे झाले. फ्रेमसारखे–खरे तर माझ्या मनासारखे–लाकूड मला गवसले नाही. एका लाकडी पट्टीसाठी सबंध दुकान मी वरखाली केले आणि नकारघंटा हलवीत बाहेर पडलो. दुसरा, तिसरा. दुकानांच्या संबंध ओळीच्या ओळी मी धुंडाळल्या. अखेर एका–दोघांनी तर आश्चर्यपूर्वक सांगितले, "आमच्याकडे आले होते तुम्ही ? अजून डिझायन मिळाला नाही काय ?"

हताश होऊन मी परत फिरलो आणि गावाला वळसा घातल्यानंतर कळसा काखेतच सापडावा, तसा युसफभाई मला गवसला.

कोपऱ्यावरच युसफ एका खुराड्यात फ्रेम्सचे काम करीत बसला होता. त्याच्याजवळच ती फ्रेम्सची पट्टी पडलेली होती. ओठी आले, ते गाणे मी गुण-

गुणलो. ते आनंदाचे होते. चुटकी वाजविल्यासारखे ते मला तालसिद्ध वाटले. शेजारून जाणारा माणूस किंचित नवलाने पहात पुढे गेला. त्याला माझे 'छिपनेवाले! सामने आ!' गुणगुणणे ऐकू गेले बहुधा. माझा आनंद ऐकू गेला की नाही, कोण जाणे. मी रस्ता ओलांडला. माझी चीज मला सापडली होती.

हीच फ्रेम्! युसफशी मी सौदा पटविला आणि सुटकेचा श्वास सोडून परत फिरलो. दोनच दिवसात चित्र चौकटीत बसवून देण्याचे त्याने कबूल केले होते. फ्रेमचे कोरवंद काम माझ्या मनासारखे सापडले होते. मी मनोमन माझ्यावर खूष झालो होतो.

आणि त्यानंतर युसफ गायब झाला होता! आजची चौथी वेळ. वारंवार हेलपाटे घालूनही मला तो सापडला नव्हता. ते चित्र त्याने कोणाला विकले की काय, कळायला मार्ग नव्हता–मी रिकामा उरलो, हे खरे!

आता त्या गिऱ्हाइकाला काय सांगू? त्याला मुळीच शंका नव्हती. मला त्याने शब्दाने विचारले नाही. मीच मनोमन मरून गेलो होतो. दुसरे चित्र जवळ नसल्याचे त्याने मला केव्हाच सांगितले होते! चूक शंभर टक्के माझी होती. आंधळेपणाने ते दुर्मिळ चित्र या अशा बिनभरवशाच्या माणसाजवळ देणे, यासारखा '–पणा' दुसरा कोणता असणार होता?

त्याला ते स्पष्ट सांगणे मला साधले नाही. मी त्या चुकीवर पांघरूण टाकले आणि कागद तयार केला. अगदी तसा–जीर्ण! आणि आठ दिवस खपून, चिडत, संतापत, स्मृतीतले चित्र त्यावर काढले! माझा असिस्टंट घाबरला होता आणि ते काम पूर्ण झाले तेव्हा मला माझेच हसू आले होते. मला कोणीही मदत करू शकत नव्हते! चिडू नको तर करू काय?– माझी आठवण मलाच जागवावयाची होती! तो काय करणार?

'याला फ्रेम काही मिळत नाही. तुम्ही ते घेऊन चला!' चित्र त्याच्यासमोर ठेवून मी त्या गिऱ्हाइकाला चक्क बजावले. तो चकित झाला. परंतु मी त्याला अवाक्षर काढू दिले नाही. हे काम मला शक्य तेवढ्या लवकर दृष्टीआड करावयाचे होते. मला तिकडे पाहणेही असह्य झाले होते.

त्याचे पैसेही मी त्याच्यासमोर ठवले आणि सावधगिरीने पहात राहिलो. आता वेळ परीक्षेची होती! तो चित्र न्याहाळीत होता.

'नाहीच म्हणता मग?" त्यान विचारले.

मी मुंडके हलविले. चले जाव! असे चक्क सुचविल्यासारखा उभाच राहिलो. मनोमन मात्र धडधडत होतो भीतीने. ब्रेक लावून गाडी जागच्या जागी उभी करावी तसा. चित्र पाहिले नव्हते. माझी लबाडी–

परंतु घडले काहीच नाही. 'ठीक आहे.' तो नाइलाजाने म्हणाला आणि चित्र घेऊन बाहेर पडला. त्याला पुसटसाही संशय आला नव्हता!

त्याच्या पाठीमागे मी दार लावले आणि अक्षरशः नाचलो. मी जिंकलो होतो! त्याला पुसटसाही संशय आला नव्हता. माझे काम बेमालूम साधले होते!

का कोण जाणे. परंतु हा आनंद मला फार काळ लाभला नाही. भरतीच्या लाटेसारखा ओसरून गेला. एक विलक्षण रुखरुख लागून राहिली. त्या स्त्रीच्या आत्म्याला दुखावल्यासारखा अपराधीपणा मला सारखा टोचू लागला. मूळ चित्राला त्या बाईचे हात लागलेले होते. तिच्या नवऱ्याला त्या जाणिवेचा आधार असावा; तो माझ्या चुकीने हिरावला गेला होता व त्याला त्याची कल्पनाही मी एका शब्दाने दिली नव्हती!

या टोचणीवर काय करावे मला कळेना. त्याला जाऊन सांगणे मला नामुष्कीचे होते. मी पुनः एकदा लज्जेच्या आवर्तात सापडलो होतो आणि त्याचवेळी एक विलक्षण गोष्ट घडली. दुपारची वेळ. कॉलबेल वाजली. मी पहातच राहिलो. चकित होऊन गेलो. तोच माणूस परत समोर आला होता!

–याने ओळखले तर नाही?

परंतु नाही! 'माफ करा!' तो कसनुसे हसणे म्हणाला, 'तुम्हाला पुनः त्रास द्यायला आलो आहे.' तो बोलत राहिला आणि माझ्या तोंडावरचे रंग बदलत गेले. त्याचे ते चित्र वाऱ्याने उडून, नदीत पडले होते! पार वहात जाऊन नजरेआड झाले होते! माझा खोटेपणा पार वाहून गेला होता.

'आता तिचे रूप मला कोठून दिसणार हो?' तो एवढा थोरला माणूस अगतिक आवाजाने मला म्हणाला.

–छिपनेवाले! सामने आ!–माझ्या ओठी एकदम गाणे आले. मी पुढे झालो. त्याच्या खांद्यावर थोपटून म्हणालो, 'मी आहे ना? मी काढतो!'

त्याने मान डोलावली आणि माझ्या कवितेतल्या त्या कारटीच्या गालांवर झुलपे हेलकावून गेली. आगगाडीच्या शिट्टीसारखी तिची साद माझ्या मनात–मानसात लख्ख उमटत राहिली–'कूकुक्! कवि, कूकुक्!'

• • •


# फिडेल, चे आणि क्रांती

लेखक : अरुण साधू

किंमत : सात रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

पुस्तके

# प्रबोधन

## युरोपीय, भारतीय, की महाराष्ट्रीय ?

प्रा. ग. भा. जोशी

'भारतीय प्रबोधन' या नावाचा समीक्षणात्मक आणि चिकित्सात्मक ग्रंथ पुण्याच्या 'समाज प्रबोधन संस्थेने' विख्यात गांधीवादी विचारवंत माननीय शंकरराव देव यांच्या जीवन चिंतनाला अभिवादन म्हणून १९७३ च्या जुलैत प्रसिद्ध केला आहे.

संपादकांनी (कै. दि. के. बेडेकर आणि प्रा. भा. शं. भणगे) या ग्रंथाची मांडणी एकूण ४ विभागात केली असून एकूण त्या त्या क्षेत्रातील ३२ अभ्यासू व्यक्तींच्याकडून लेख लिहून घेऊन या ग्रंथात समाविष्ट केले आहेत. या विषयावर संपादकांनी आधीच आपली मते निश्चित करून मग ती चर्चेकरिता लेखकांच्याकडे पाठविली नाहीत तर या विषयाचे प्रमुख असे तीन भाग कल्पून, त्यातील उपविषयांची नोंद करून त्याप्रमाणे लेख लिहिण्याची विचारवंतांना विनंती केली आहे.

पहिला भाग म्हणजे–प्रबोधन स्वरूप. या विभागात 'प्रबोधनाचे स्वरूप' 'परंपरा', 'धर्म', 'ऐहिक जीवन', 'पारंपरिक राष्ट्रवाद', 'महाराष्ट्रातील प्रबोधन पर्व', 'भारतीय प्रबोधनाची वाटचाल', 'प्रबोधनाच्या वाटा आणि वळणे', 'प्रबोधनाची दिशा' इत्यादि विषयांचे विश्लेषण करणारे लेख आहेत. या सर्व लेखात युरोपातील १५ व्या आणि १६ व्या शतकातील प्रबोधनाचे स्वरूप, त्याची पार्श्वभूमी, प्रबोधन संज्ञेचा अर्थ आणि व्याप्ती यांची चिकित्सा केली आहे. तसेच युरोपातील धर्मसुधारणा (रेफर्मेशन), एन्लायटनमेंट, लोकशाहीच्या मूलभूत कल्पना आणि प्रेरणा यावरही प्रकाश टाकणारे लेख आहेत. अर्थात या ग्रंथातील सर्वच लेखक समर्थ विचारवंत असल्यामुळे प्रत्येकाने स्वतंत्रपणे आपापल्या विषयाचा मागोवा घेऊन विचार दर्शन घडविले आहे, तरीही अनेक ठिकाणी 'युरोपीय प्रबोधन' विषयांची पुनरुक्ती झालेली आढळून येते तर काही ठिकाणी वैचारिक मतभेद जाणवतात. अनेक विचारवंतानी मांडलेला विषय, त्यातून निष्पन्न होणारा ग्रंथ, त्याविषयी संपादकांची असणारी काही अपेक्षा व योजना यांचे जमेलच असे नाही. आणि जमले नाही तरी त्यात काही बिघडते असे नाही अशी कबुली संपादकांनी दिली आहे. मला असे वाटते की, 'युरोपीय प्रबोधन–त्याचा अर्थ, कार्य आणि व्याप्ती' विशद करणारा एक लेख निश्चित करून मग विविध विषयावरचे लेखन मागविले गेले असते

तर निदान 'युरोपीय प्रबोधनाच्या' पुनरुक्तीचा दोष टाळता आला असता. आणि या विभागातील सर्वच लेखनावर जर संपादकांचा समर्थ हात फिरला असता तर निदान ग्रंथ प्रमाणबद्ध होऊन याहून अधिक नीटस मांडणी करता आली असती. असो.

ग्रंथाचा दुसरा विभाग म्हणजे 'प्रबोधनाची क्षेत्रे'—यामध्ये 'मुस्लीम-समाज', 'बहुजन समाज', 'अस्पृश्यता', 'स्त्रीजीवन', 'कामगार चळवळ', 'ग्रामीण समस्या' आणि 'आदिवासीचे प्रश्न' या संबंधीचे १० लेख आहेत.

ग्रंथाच्या तिसऱ्या विभागात प्रबोधनाच्या साधनांची चिकित्सा केली असून त्यात 'वृत्तपत्रे', 'संसदीय लोकशाही', 'सर्वोदय', 'समाजवादी चळवळ', 'शिक्षण आणि पंचायत राज्य' इ. संबंधी ७ लेख आहे.

आणि चौथ्या विभागात दे. भ. शंकरराव देवांच्या जीवनाच्या मूलभूत प्रेरणांचे आणि त्यांच्या दीर्घायुष्यातील विविध प्रयोगाचे स्वरूपदर्शन सुप्रसिद्ध गांधीवादी विचारवंत कै. आचार्य भागवत यांनी मार्मिकपणे घडविले आहे. बहुधा आचार्यांचा हा शेवटचाच लेख असावा.

'भारतीय प्रबोधनाची वाटचाल' या लेखाचे लेखक क्षितीमोहन मुखर्जी सोडले तर बाकीचे लेखक महाराष्ट्रीय आहेत. त्यामुळे 'भारतीय प्रबोधन' असा चर्चाविषय आणि त्याचा संदर्भ अखिल भारताचा योजूनही अनेक लेखात मुख्यत: महाराष्ट्रातील प्रबोधनाचा विचार झालेला आहे. आणि 'असे होणे हे स्वाभाविकच आहे' अशी भलावण जरी संपादकांनी केली असली तरी एकूण विषयाच्या, स्वरुपाच्या आणि मांडणीच्या आणि विवेचनाच्या दृष्टीने यात थोडी उणीव राहिली आहे असे म्हणणे भाग आहे.

'प्रबोधनाने आधुनिक युगास प्रारंभ झाला. हे प्रबोधन युरोपमध्ये रेनेसान्स रेफर्मेशन, एनलायटनमेंट, औद्योगिक क्रांती, फ्रेंचराज्यक्रांती यातून सिद्ध झाले. ह्या चळवळी किंवा घटना मागील विविध प्रेरणा परस्पर-पूरक होत्या, कमी-अधिक प्रगल्भ होत्या...इंग्लंडच्या मार्गे जे प्रबोधन भारतात झाले ते इंग्लंडमध्ये पोसलेले व समृद्ध झालेले होते...तेव्हा याचे स्वागत भारतात संमिश्र झाले. कारण परंपरेचा विरोध, अज्ञान आणि भारतीय समाजरचनेत प्रबोधनाला पाठिंबा देणारा वर्ग तयार झाला नव्हता. कारण भारतीय व्यक्ती आणि पाश्चिमात्य व्यक्ती यात वेगळेपण होते'—असा अत्यंत समर्पक विचार संपादक प्राचार्य भणगे यांनी संपादकीयामध्ये मांडला आहे. पण पुढे ते असे लिहितात की, 'येथील सुधारणा कायद्याने करावी तर, कायदा करण्यात तो करणाऱ्यांचाच विरोध— कारण राज्यकर्ते व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वास बांधलेले'—हे त्यांचे विधान फसवे वाटते. कारण इंग्रज राज्यकर्त्यांना भारतात कायद्याने सुधारणा करावयाच्या होत्या पण व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वाला बाधा येलई

म्हणून केवळ त्यांनी सुधारणेसंबंधी कायदे केले नाहीत असा प्राचार्य भणगे यांच्या विधानाचा एक अर्थ निघतो. म्हणून हे विधान संपूर्ण अनैतिहासिक वाटते. असे जरी असले तरी प्राचार्य भणगे यांनी पुढील -आपले विवेचन सुरेख आणि साधार केले आहे. 'प्रतिकारातूनही जे प्रबोधन झाले ते अलिकडे स्वातंत्र्याच्या काळात मात्र जमले नाही '–या विधानाचे त्यांनी उदाहरणासह स्पष्टीकरण करून जे विचार मांडले आहेत त्याबद्दल त्यांचे खरोखरीच अभिनंदन करायला हवे.

## प्रबोधनाचा आलेख

या ग्रंथातील पहिल्या विभागातील पहिलाच लेख श्री. मे. पु. रेगे यांचा 'प्रबोधनाचे स्वरूप' हा आहे. त्यांनी आपल्या लेखात प्रबोधनाचा मागोवा, युरोपीय समाज, तेथील धार्मिक प्रवृत्ती, विज्ञान निष्ठांची परंपरा, रेफर्मेशनने दिलेला सामाजिक आशय, रेनेसाँची सौंदर्यान्वेषी प्रेरणा आणि प्रॉटेस्टंट वादाची नैतिक आणि आध्यात्मिक प्रेरणा यांच्यातील वेगळेपण एन्लायटनमेंटचे नवे तत्त्वज्ञान. अशा युरोपीय समाजाशी भारताची पडलेली गाठ, नंतरचा झालेला आपला राजकीय, लष्करी पराभव, भारतीय समाजातील उणीवा, अंधश्रद्धा, अज्ञान, मागासलेपण असूनसुद्धा राजाराममोहन रॉय यांच्या लिखाणात कुठेही पराभूत, दुबळा न्यूनगंड दिसत नाही. या संबंधीचे विवेचन, मेकॉलेप्रणित हिंदुस्थानबद्दलचे रंगविलेले स्वप्न आणि भविष्य, इंग्लंड-भारताचा गुरुशिष्य संबंधाचा दृष्टिकोन कसा फसवा होता आणि त्याचे स्वप्न कसे भंगले आणि भविष्य का व कसे खोटे ठरले याचे विवेचन, त्याबद्दलचा ऐतिहासिक दृष्टिकोन, भारतातील हिंदु-मुस्लीम संघर्षावर टाकलेला प्रकाश आणि प्रबोधनाचे उद्दिष्ट इ. महत्त्वाच्या मुद्यांचे विश्लेषण, स्पष्टीकरण अतिशय समर्पक आणि ओघवत्या भाषेत केले आहे. या ग्रंथातील एक सुरेख लेख असेच वर्णन करावे लागेल.

'परंपरा आणि प्रबोधन' हा प्रा. श्रीनिवास दीक्षिताचा लेख आधुनिकतेचे प्रमेयाद्वारे विश्लेषण करणारा, पुरोगामित्व आणि प्रतिगामित्व यांची छाननी करून स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांची अध्यात्मिक पातळीवर चर्चा करणारा लेख काहीसा या ग्रंथाच्या विषयाच्या दृष्टीने वेगळा वाटतो.

'धर्म आणि ऐहिक जीवन यांच्या संबंधीच्या समस्या' हा पत्रपंडित पां. वा. गाडगीळांचा उल्लेखनीय असा एक लेख–प्राचीन रोमनकाळापासून तो युरोपातील धार्मिक संघर्षा पर्यंत शेकडो वर्षे माणसानी धर्माच्या नावाखालचा जुलूम, अज्ञान, अंधश्रद्धा यामुळे कसा सहन केला हे त्यांनी विशद केले असून प्रबोधनकाळात व त्यानंतर आर्थिक प्रगतीचा हव्यास आणि शास्त्रीय प्रगती यामुळे धर्ममहत्त्व कसे कमी झाले या संबंधी साधार विवेचन केले आहे. तसेच मध्ययुगीन प्रसिद्ध इटालियन मुत्सदी मॅकियान्हेली याने धर्मकल्पनेची क्रूर चेष्टा कशी केली हे

त्याच्याच शब्दात वर्णिले आहे. आशियातील धर्मकल्पनेचा विचार मांडताना हिंदुधर्माचे विश्लेषण करून चातुर्वर्ण्य आणि शिकवण या संबंधी आणि धर्मांतरासंबंधीचे विवेचन यात आढळते. तथापि शास्त्रपूर्व काळात आणि राज्यशासन पूर्वकाळात भारतात धर्माने नैतिक, सामाजिक चिरंतन उच्च मूल्ये कशी जतन केली याचाही उहापोह करून समतोल विचार मांडला आहे. मार्क्सप्रणित धर्मकल्पनेचा विचार कसा आग्रही असहिष्णु आहे हे दाखवून सहिष्णुता, मानवता इ. गुणांचे पुनरुज्जीवन व्हावे आणि मानवधर्माचा उत्कर्ष व्हावा असे प्रतिपादन केले आहे.

'धर्म आणि सामाजिक प्रबोधन' या आपल्या लेखात श्री. अ. भि. शहा यांनी भारतीय धर्म संकल्पनेच्या संदर्भात म. गांधीजींच्या धार्मिक क्रांतिकारक कामगिरीचा आढावा घेऊन महात्माजींनी प्रबोधनाच्या कल्पनेत भर घालण्यापेक्षा तिची सामाजिक व्याप्ती वाढविण्यात, स्त्रिया व अस्पृश्य, पददलितांची प्रगती करण्यातील ध्येयाचरण कसे आखले ते सांगूनही गांधीजींनी राजकारणाकडे अधिक लक्ष दिल्यामुळे अपयश का आले याची चर्चा केली आहे. शेवटी पददलित आणि अनुसूचित जातीतून नेतृत्व निर्माण झाल्यास प्रबोधनास खरी चालना मिळेल असे ते जेव्हा आपले मत व्यक्त करतात तेव्हा एक संदेह निर्माण होतो की, केवळ मागास जातीतील नेतृत्त्वामुळेच प्रबोधधनाचा आशावाद बाळगावा का ?

श्री. वसंत पळशीकरांनी 'पारंपारिक राष्ट्रवादापासून मुक्तता' या लेखात राष्ट्र आणि राष्ट्रवाद यांचा उहापोह केला आहे. भारतात जाज्वल्य व कडवी राष्ट्रनिष्ठा निर्माण केल्यानेच एक समर्थ राष्ट्र बनेल हा काहीसा हिंदुत्ववादी दृष्टिकोन बहुतेकांना मान्य होईल असे प्रतिपादन करून पुढे त्यांनी स्वा. सावरकरांच्या हिंदु राष्ट्रवादाला आक्षेप घेतलेले दिसतात आणि ज्यांच्या निष्ठा आर्थिक व समाजिक समतेवर आधारलेल्या आहेत त्यांनी पारंपारिक राष्ट्रवादी तत्त्वज्ञानाचा बुद्धिपुरस्सर त्याग केला पाहिजे असे ते आग्रहपूर्वक सांगतात. हा एक विवाद्य लेख आहे एवढेच आपणाला म्हणता येईल.

## खंडित प्रकिया

श्री. क्षितीमोहन मुखर्जी यांनी आपल्या 'भारतीय प्रबोधनाची वाटचाल' या लेखात रेनेसान्स नामक प्रक्रियेत आणि घटनेत व्यक्तिप्रतिष्ठा, मूलभूत मानवी हक्क, समता, शास्त्रीयदृष्टी या सगळ्यांचा उगम पाहणे हे इतिहासाला धरून नाही. इतरही अनेक गोष्टी आल्या आणि याव्या लागल्या. त्या सर्वांचा एकत्रित परिणाम आहे. तसेच 'रेनेसान्स'पासून एकच चळवळ अविच्छिन्नपणे प्रयत्नशील होती व ती यशस्वी झाली असे मानणे चुकीचे आहे. असा विचार मांडून भारतीय प्रबोधनाची चर्चा करताना युरोपातील रेनेसान्सशी तुलना करण्याचा किंवा भारतीय प्रबोधन हे रेनेसान्सशी समां-

# तुम्ही पगारी कर्मचारी आहात काय ?
# तुम्ही स्वतःचे प्राप्तिकरप्रपत्र भरले आहे काय ?

अगदी निव्वळ पगार हेच एकमात्र उत्पन्न असलेल्या व्यक्तीसकट प्रत्येक व्यक्तीस, जर तिचे आदल्या वर्षीचे एकूण उत्पन्न, प्राप्तिकरकायदा (इन्कम-टॅक्स ॲक्ट) १९६१ नुसार मिळत असलेल्या विविध स्वरूपाच्या करविषयक सवलती लक्षात घेऊन देखील, ५,००० रुपयांपेक्षा जास्त असेल तर प्राप्तिकरप्रपत्र भरणे, कायद्यानुसार, आवश्यक असते.

**अचूक प्राप्तिकरप्रपत्र भरल्यामुळे तुमच्या प्राप्तिकर अधिकाऱ्यास खालील गोष्टींची खात्री करून घेणे शक्य होईल :–**

(अ) कायद्यानुसार तुम्हाला मिळणाऱ्या सर्व सवलती वा फायदे, घेण्यास कोणतीही हरकत असू नये.

(ग) द्यावयाच्या करापेक्षा, जास्त कर तुम्ही भरलेला असल्यास तो तुम्हाला तत्परतेने परत केला जावा.

प्राप्तिकरप्रपत्र किंवा जास्त माहिती मिळविण्यासाठी, कृपया तुमचा मूल्यमापन प्राप्तिकर अधिकारी किंवा प्राप्तिकर विभागाचा जनसंपर्क अधिकारी यांच्याशी संपर्क साधा.

**तुमच्या प्राप्तिकरप्रपत्रात स्वतःचा कायम खाते क्रमांक लिहिण्याचे कृपया** लक्षात ठेवा. आतापर्यंत जर तुम्हाला कायम खाते क्रमांक मिळाला नसेल तर तो मिळावा म्हणून कृपया तुमच्या प्राप्तिकर अधिकाऱ्याशी अथवा प्राप्तिकर आयुक्ताशी (कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स) संपर्क साधा.

**डायरेक्टोरेट ऑफ इन्स्पेक्शन**
(रीसर्च, स्टॅटिस्टिक्स ॲण्ड पब्लिकेशन्स)
न्यू दिल्ली

**davp. 73/292**

तर अशी घटना-प्रक्रिया असावी अशी अपेक्षा बाळगण्यात धोका असतो हे स्पष्ट केले आहे. तसेच भारतीय प्रबोधनाचा परामर्श घेताना अकबरकालीन हिंदु-मुस्लीम समाजाची व संस्कृतीची जडणघडण करण्याचा जो प्रयत्न झाला तो एक प्रबोधनाचा आविष्कार असून त्यानंतर कर्मकांडाला छेद देणारा जो भक्तिसंप्रदाय निर्माण झाला तो दुसरा आविष्कार आणि रामदास व शिवाजी यांनी धर्म व राजकारण या क्षेत्रात हिंदूंची संघटना बांधून इस्लामी धर्म व राज्यसत्ता यांना यशस्वी प्रत्युत्तर दिले हा येथील नवजागरणाचा तिसरा आविष्कार असे म्हटले आहे. पण पुढे मात्र १८–१९ शतकात युरोपमध्ये जसे प्रबोधन घडून आले तसे व्यक्तिवादी व तंत्रविज्ञाननिष्ठ समाज अस्तित्वात आला नाही याची दखल घेतानासुद्धा रॉय हे भारतीय प्रबोधनाचे आद्य प्रणेते आहेत असे ते मानतात.

भारतात प्रबोधनाची प्रक्रिया खंडित का झाली याचे विवेचन करताना भारतीय शहरे ही सत्तेची केंद्रे बनली नाहीत, शेतकरी, व्यापारी यांचे कारभाराचे परिमाण वाढून त्यांची लुबाडणूक झाली, तसेच हिंदु-मुस्लिम संघर्ष तीव्र झाला आणि व्यापारी वर्ग व राज्यकर्ता वर्ग यांची हातमिळवणी झाली नाही. एकात्म राजकीय समाज निर्माण न झाल्यामुळे येथे प्रबोधनाची प्रक्रियाच अस्तंगत झाली. आर्यसमाजी, थिऑसफिस्ट आणि परंपरावादी श्रद्धा बाळगणाऱ्यांच्या १९ व्या शतकाच्या शेवटी स्वतंत्र लढ्याची सूत्रे हाती गेल्यामुळे नव्या प्रबोधनातील जोम संपला हे विधान अधिक तपासून घ्यायला हवे असे वाटते.

स्वातंत्र्योत्तर काळातील परिवर्तनाचा वेग ते मान्य करतात पण भारताचे आजचे चित्र चिंताजनक असल्याचे सांगून येथे प्रबोधन विरोधी शक्ती प्रबल होत आहेत आणि त्या भारतीय जीवनास अंधधर्म श्रद्धाधिष्ठित पुराणमतवादी शृंखलांनी जखडून टाकतील हा मोठा धोका ते दाखवितात.

श्री. प्रभाकर पाध्ये यांनी आपल्या 'प्रबोधनाच्या वाटा व वळणे' या लेखात राजा राममोहन रॉय यांच्या कार्यापासून तो आजच्या स्वातंत्र्योत्तर १५।३० वर्षांच्या कालखंडात प्रबोधनाची जी वाटचाल झाली त्यातील अडथळे, उणिवा, दोष यांचेसह मार्मिक विश्लेषण केले आहे. तसेच प्रा. रा. भि. जोशी, आणि प्रा. रा. वि. ओतुरकर यांनी आपापल्या निबंधांत गेल्या १५० वर्षांतील विचारवंतांच्या कर्तृत्वाचा आणि इतिहास संशोधनाचा तपशीलवार आढावा घेतला आहे.

'सामाजिक धर्मबुद्धीचे क्रियाशील भाष्यकार' म्हणून श्री. वि. स. खांडेकर हे महात्माजी, विनोबा आणि पं. नेहरू यांच्या कालखंडाचा व कर्तृत्वाचा मागोवा घेताना स्वातंत्र्योत्तर काळातील मानवी मूल्यांची झालेली घसरगुंडीही ते स्पष्टपणाने दाखवितात.

प्रा. दि. के. बेडेकर 'दुसऱ्या प्रबोधनाची चाहूल' या लेखात आणि श्री.

ना. ग. गोरे यांनी आपल्या 'पुनरुत्थान जागरण की आक्रोश' या लेखात प्रबोधनाच्या संकल्पनेसंबंधी इतर लेखाहून वेगळे पण अधिक वास्तववादी आणि धारदार किंचित नैराश्याकडे झुकणारे विचार मांडले आहेत. वेडेकरांनी आपल्या लेखात भारतीय प्रबोधनाचा प्रवाह आटला आहे व एका नव्या भारतीय प्रबोधनाची चाहूल आता ऐकू येत आहे या विधानावर आपली मांडणी केली आहे. आपल्या विवेचनात त्यांनी प्रबोधन हे समाजातील एका समूहाच्या मनात आणि कृतीत घडते आणि प्रबोधन ही एका लहान समूहाची समाजात पसरत जाणारी बंडखोरी असते म्हणूनच प्रबोधन हे एक सर्जन असते. शिवाय प्रबोधनाची प्रक्रिया साखळीक्रमाने भव्य आकार घेताना त्याला कोंडाळी पडतात असे सांगून पुढे त्यांनी भारतीय प्रबोधनाचा भव्याकार वाढताना इंग्रजांचे बाहेरचे कोंडाळे सामर्थ्यवान होते आणि हिंदुपरंपरा आणि मुस्लिमपरंपरा ही दोन आतील कोंडाळी आहेत असे प्रतिपादन केले आहे. यामुळे अडसर निर्माण झाला असे त्यांचे म्हणणे आहे ते पूर्णपणे रास्त आहे. व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही, राष्ट्रवाद, मानवतावाद या प्रबोधन निष्ठांचे अवमूल्यन झाल्यामुळे त्यांच्यामते आज त्यावर विसंबून राहवत नाही. म्हणून या अवस्थेकडे पाहून ते पहिले प्रबोधन संपले असे म्हणतात. पण त्याबाबत पूर्ण निराश झालेले नाहीत कारण माणूस संपलेला नाही आणि निष्ठांचा शोध संपलेला नाही. यावर त्यांचा दृढ विश्वास आहे. नवे प्रबोधन आज क्षितिजावरही नाही, अजून रात्र आहे असे ते सांगतात. आणि पुढची वाट शोधण्याची जबाबदारी माणसावर आहे असा आशावाद ते व्यक्त करतात.

श्री. ना. ग. गोरे भारतीय प्रबोधनात व्यापक, सर्वस्पर्शी आशय आणि नव्या श्रेष्ठता जीवनाचे दिशासूचन आढळत नाही, तसेच आपण पुनरुत्थान हा शब्द ढिलेपणाने वापरतो असे म्हणतात. इस्लाम व युरोपीय संस्कृतीच्या आक्रमणामागची मानसिक, आर्थिक, राजकीय प्रेरणा आपण समजावून घेतली नाही असे त्यांचे म्हणणे. आजच्या भारतीय समाजात प्रकट होणाऱ्या इच्छा आकांक्षा व विचार यांना ठळक लक्ष्य हवे, अग्र हवे, पाठबळ हवे नाहीतर पुनरुत्थान, जागरण, उद्‌बोधन हे शब्द अनाठायी ठरतील. सध्यातरी त्यांना आक्रोश आणि क्षोभ दिसतो. म्हणून खऱ्या राष्ट्रीय उत्थापनाची आशा बाळगण्याची हिंमत नाही असे त्यांचे एकूण प्रतिपादन आहे.

## विविध क्षेत्रे

या ग्रंथाचा दुसरा विभाग प्रबोधनाची क्षेत्रे असा असून प्रामुख्याने ज्या क्षेत्रात प्रबोधन व्हायला हवे होते असे 'मुस्लीम', 'बहुजन समाज,' 'अस्पृश्य,' 'स्त्री जीवन', 'कामगार जीवन,' 'युवकांची पिढी,' 'ग्रामीण जीवन,' अशा समाजातील महत्त्वपूर्ण घटकांचा विचार केलेला आढळून येतो. या घटकात प्रबोधनाच्या मार्गातील अडसर

कोणते आहेत, उणिवा काय आहेत याचेही दर्शन घडविले गेले आहे. श्री. हमीद दलवाई यांनी आपल्या लेखात मुस्लिम समाजाच्या ऐतिहासिक जीवनाचा सामाजिक आणि राजकीय दृष्टया आढावा घेऊन अरब जगतात प्रादेशिक राष्ट्रवाद हळूहळू जोपासला गेला तसा भारतातील मुसलमानांना भारतीय राष्ट्रवादाचे आकर्षण निर्माण झाले नाही. तसेच ख्रिश्चन संघटनेप्रमाणे किंवा रामकृष्ण मिशनप्रमाणे केवळ सेवेचे कार्य करणारी एकही मुस्लीम संस्था अस्तित्वात नाही हे पण त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. आणि शेवटी त्यांनी इस्लामची चौकट मोडण्याचा प्रामाणिक प्रयत्नच अजून झाला नाही व खऱ्या अर्थाने इस्लाममध्ये मार्टिन ल्यूथर जन्माला आला नाही असे प्रतिपादन करून मुस्लीम प्रबोधनाच्या वाटचालीतील अडचणी परखडपणे व्यक्त केल्या आहेत.

श्री. माधवराव बागलांनी आपल्या नेहमीच्या पद्धतीने बहुजनसमाजाच्या चळवळीचे विश्लेषण केले आहे. भारतीय प्रबोधनाच्या संदर्भात विचार मांडीत असताना ते महाराष्ट्रापुरते आणि शेवटी कोल्हापूर संस्थानापुरतेच आपली मते संकुचित करून सांगतात तेव्हा 'बागल' ज्यांना परिचित आहेत त्यांना तरी नवल वाटत नाही. महात्मा फुले, छ. शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर यांचे विचार कसे व्यापक, विशाल, आणि देशव्यापी होते हे सांगताना त्यांना एका विशिष्ट दृष्टिकोनात, भौगोलिक सीमेत जखडून ठेवले गेले आहे. रॉयपासून ते दयानंदापर्यंतच्या व्यक्तींनी बहुजन समाजाच्या सुखदुःखाचा विचार केला नव्हता म्हणून त्यांची चळवळ मर्यादित राहिली असे एका वाक्याच्या फटकाऱ्यांत सर्वांना गारद करणाऱ्या बागलांकडून समतोल, पूर्वग्रह दूषित नसलेल्या दृष्टीची अपेक्षा करावी तरी कशी ? स्वतंत्र कोल्हापूर संस्थानासाठी बागलांनी केलेला आटापिटा व त्याचे हास्यास्पद समर्थन आक्षेपार्ह तर आहेच पण या ग्रंथाच्या व विवेचनाच्या संदर्भाला सोडून आहे. याची संपादकांनी दखल घ्यायला हवी होती. आपल्या लेखाच्या शेवटी मात्र त्यांनी प्रामाणिकपणे बहुजन समाजातील कार्यकर्त्यांना सुयोग्य मार्गदर्शन केले आहे. ब्राह्मणेतर चळवळीचा इतिहास श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी कथन केला आहे. श्री. रामटेके व पन्नालाल सुराणा यांनी अस्पृश्यतेवर अभ्यासपूर्ण निबंध लिहिले आहेत. 'आमचे आजचे स्त्री-जीवन,' —कृष्णाबाई मोटे, 'भारतीय कामगार चळवळीचे अर्ध शतक,' —गो. द. साने; 'नवे प्रबोधन व युवक' चळवळी' —सुधीर बेडेकर; 'ग्रामीण विभागातील परिवर्तन व समस्या' —वसंत देशपांडे; 'आदिवासींचा प्रश्न' —गोविंद गारे —हे सारेच लेख त्या त्या क्षेत्राचा आढावा घेणारे, त्यांतील अडचणी, अडथळे कथन करणारे, त्यावर उपाय सुचविणारे असे आहेत.

ग्रंथाच्या तिसऱ्या विभागात प्रबोध-

नाच्या साधनाचा विचार प्रामुख्याने मांडला आहे. 'मराठी वृत्तपत्रे'– श्री. शं. नवरे; 'संसदीय लोकशाहीत प्रत्यक्ष कृतीचे स्थान' – रा. कृ. पाटील; 'म. गांधींचीची सर्वोदयाची दृष्टी' – वसंत नारगोलकर; 'समाजवादी चळवळ'– एस. एम. जोशी; 'शालेय शिक्षण;' —ग. वि. अकोलकर' विद्यापीठांतील शिक्षण'—गोवर्धन पारीख; 'सामाजिक शिक्षण व पंचायत राज्य' – ए. एच. डॉक्टर; या साऱ्याच लेखकांनी आपापल्या लेखात प्रबोधनाच्या संदर्भात साधनांचा विचार तपशीलवार कथन केला आहे. विपुल माहिती दिली आहे. प्रबोधनाला या साधनांनी वेळोवेळी कसा हातभार लावलेला आहे, सहाय्य केले आहे हे सांगताना या साधनांचा अपुरेपणा, त्यातील दोष आणि उणिवा अधिक परखडपणे स्पष्ट केल्या आहेत. या सर्वच लेखांच्यावर स्वतंत्रपणे विचार करण्याइतके ते महत्त्वाचे आहेत.

शेवटी या ग्रंथात प्रबोधनाच्या संदर्भात अखिल भारतीय पातळीवर अधिक चर्चा करणारे लेख समाविष्ट करता आले असते तर सामग्र्याने आणि साकल्याने 'भारतीय प्रबोधनाचे' वाचकांना दर्शन झाले असते. तसेच भारतीय प्रबोधनाचा विचार करताना विज्ञान, साहित्य, कला (Fine Arts) या क्षेत्रांची उपेक्षा का झाली ते समजत नाही. तसेच यातील लेखकांचा अल्प-परिचय आणि त्यांच्या लेखांच्या संदर्भ ग्रंथाची यादी विस्तृतपणे दिली गेली असती तर जिज्ञासू वाचकांची अधिक सोय झाली असती. तरी संपूर्ण ग्रंथ वाचून झाल्यावर एक मोठे समाधान मनाला लाभते आहे आणि ते म्हणजे आजच्या तरुणपिढीला प्रबोधनाची व्याप्ती, कार्य आणि महत्त्व यांची जाणीव करून देण्याचे आणि मार्गदर्शन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या ग्रंथाने केले आहे. ◻

भारतीय प्रबोधन

समाज प्रबोधन संस्था, पुणे

किंमत पंधरा रुपये

पृष्ठे ५००

---


# एका पराभवाची कहाणी

ले. : ब्रिगेडियर जे. पी. दळवी । अनुवाद : अनंत भावे

मूल्य : पंधरा रुपये । राजहंस प्रकाशन

# फोर्टमधील फेरीवाल्यांचा समस्या

## वास्तुकलेच्या विद्यार्थ्यांनी केलेला सर्वांगीण अभ्यास

काही दिवसापूर्वी मुंबईतील अॅकॅडेमी ऑफ आर्किटेक्चर या वास्तुकला महाविद्यालयाने फोर्टमधील फेरीवाल्यांच्या समस्येवरील अभ्यासाचे असंख्य आराखडे, रेखाचित्रे, लेखी निष्कर्ष, उपाययोजना याद्वारे विवरण करून त्याचे प्रदर्शन भरविले होते. याकामी त्या विद्यालयातील सहाव्या वर्षांच्या सुमारे चाळीस विद्यार्थ्यांनी दोन महिने रात्रंदिवस मेहनत करून २१ ऑगस्टपर्यंत वरील भव्य काम पुरे केले; असंख्य आराखडे, पाहाणी निष्कर्ष, कल्पक उपाययोजना यावरून त्याची निश्चितच प्रचिती येते. वरील अभ्यासगटातील एक विद्यार्थी या नात्याने आम्ही अनुभवलेल्या वेधक उपक्रमाचा येथे संक्षिप्त आढावा देत आहे. वेधक अशा अर्थाने की ही समस्या वास्तविक जुनीच, परंतु अशा रीतीने प्रथमच आम्ही हाताळली त्यामुळे विषयातील नावीन्याबरोबरच असंख्य नवे अनुभवही आम्हास आले. त्यामुळे अभ्यासगटांतील प्रत्येक विद्यार्थी आपण काहीतरी नवीन करीत आहो या भावनेने मोठ्या उत्साहाने काम करीत होता. प्रदर्शनातील काही आराखडे तब्बल चाळीस फूट लांबीचे होते, यावरून त्यासाठी घेतलेल्या मेहनतीची कल्पना यावी.

त्याचे असे झाले : मुंबईचे नवे महापौर श्री. सुधीर जोशी यांनी फेरीवाल्यांची समस्या धसास लावण्याच्या दृष्टीने प्रथमपासूनच प्रयत्न चालू केले होते. पुढे त्यांनी अॅकॅडेमी ऑफ आर्किटेक्चरचे प्राचार्य श्री. गुमास्ते यांना ही समस्या अभ्यासपूर्ण रितीने सोडवण्याची विनंती केली. श्री. गुमास्ते यांनी सहाव्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना 'नगररचना' विषयाचा भाग म्हणून सोडविण्यास दिली व आम्हीही विषयातील नाविन्यामुळे ते आवाहन उत्साहाने स्वीकारले.

या कामी आम्हास नगररचना विषयातील तज्ज्ञ प्राध्यापक सर्वश्री खंबाटा, आर्या आणि श्रीमती हंकारे यांचे मोलाचे मार्गदर्शन झाले.

फोर्टमधील फेरीवाल्यांच्या समस्येची जाणीव वास्तविक तत्कालीन सरकारला इ. स. १९१० सालीच झाली होती. परंतु प्रत्यक्ष त्यांना परवाने देण्यासाठी

इ. स. १९२१ साल उजाडावे लागले. पुढे मुंबई शहराची प्रचंड वेगाने वाढ झाली. देशाची आर्थिक, व्यावसायिक राजधानी असल्याने सर्व राज्यातून असंख्य लोक कामधंदा मिळविण्यासाठी या नगरीकडे धावले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशाच्या फाळणीमुळे लक्षावधी सिंधी व इतर निर्वासितांनी मुंबईकडे आपला मोर्चा वळविला. परिणामत: बेकारी वाढली. महागाई वाढली. आणि कळत न कळत फेरीवाल्यांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली. भांडवलाअभावी ज्यांना दुकान टाकून धंदा करणे जमत नव्हते त्यांनी फेरीवाल्याचा धंदा सुरू केला. यामुळे त्यांच्या जवळील वस्तूच्या किंमती दुकानातल्या पेक्षा कमी ठेवणे शक्य झाले. अर्थातच मग जनतेकडूनही त्यांना योग्य प्रतिसाद मिळत गेला. व तमाम फेरीवाल्यांचा मुंबईत जम बसला. परंतु तदनुषंगाने निर्माण झालेल्या असंख्य समस्या सोडविणे मात्र सरकारच्या आता आवाक्याबाहेर गेले आहे. फेरीवाल्यांच्या बेकायदेशीर वाढीला मात्र सरकारच जबाबदार मानावे लागेल. ह्याच्या वाढीचा वेग आणि सरकारचा परवाने देण्याचा वेग यातील प्रचंड तफावत गेल्या काही वर्षात वाढतच गेली. परीणामत: मुंबईत असलेल्या लाखाच्यावर फेरीवाल्यांपैकी फक्त दहा हजार फेरीवाल्यांकडेच कायदेशीर परवाने आहेत. सरकारच्या परवाने देण्याच्या अतिमंद वेगामुळे त्यांचासुद्धा काळाबाजार आज मुंबईत चालतो.

पाहाणी काळात हॉकर्स युनियनच्या प्रमुखाची मुलाखत घेण्यात आली. तेव्हा युनियनचे प्रमुख श्री. शरद राव यांनी असे प्रतिपादन केले की, 'फेरीवाल्यांची आवश्यकता ही सामाजिक गरज आहे. आज शेकडो लोक त्यावर अनेक वर्षापासून आपली उपजीविका करीत आहेत. तेव्हा त्यांच्या पोटावर पाय पडेल अशा कोणत्याही सरकारी योजनेला आम्ही विरोध करू.' याचीच दुसरी बाजू अभ्यासण्याच्या दृष्टीने सरकारी प्रतिनिधीची भूमिका देखील विचारात घेणे आवश्यक होते म्हणून लायसेन्स डिपार्टमेंटचे सुपरीटेंडेंट श्री. पटेल यांची देखील मुलाखत घेण्यात आली. त्यांनी सरकारची बाजू आणि अडचण विषद करून सांगितली. ते म्हणाले, 'सरकारला अनेक सामाजिक संस्था, राजकीय पक्ष, सरकारी निमसरकारी उत्पादने यासाठी स्टॉलस् द्यावे लागतात. त्यामुळे मोठा पेचप्रसंग निर्माण होतो. बेकायदेशीर वाढ रोखणे मात्र सरकारला आज फारच कठीण जात आहे.'

याशिवाय अभ्यासगटाने प्रत्यक्ष दादाभाई नौरोजी रोडवरील फेरीवाल्यांच्या, पादचाऱ्यांच्या, तसेच त्या भागातील दुकानदारांच्या देखील मुलाखती घेऊन अनेक बोलके निष्कर्ष काढले. नौरोजी रोड हा फोर्ट भागातील वहातुकीचा कणा आहे. त्यामुळे दुकाने पादचारी, वाहनांची वहातुक या सर्वांचा या मार्गावर सर्वात जास्त ताण पडतो. व्ही. टी. पासून म्युझियमपर्यंतच्या

मार्गावर सुमारे ९०० फेरीवाले आहेत. पैकी फक्त २०० जणांकडेच परवाने आहेत. नौरोजीरोडच्या पूर्वेकडील फूटपाथवरच प्रामुख्याने फेरीवाले बसतात कारण व्ही. टी. स्टेशनातून बाहेर पडल्यावर पादचारी सलगच्या फूटपाथने फौन्टनकडे मार्गक्रमण करतो, त्यामुळे पादचाऱ्यांची वहातुक विशेषत: पूर्वेकडच्या बाजूनेच असते. आणि जिथे पादचारी वहातुक तिथे फेरीवाल्याचा धंदा जोरात असे समीकरण असल्याने पूर्वेकडे बहुतांशी म्हणजे सुमारे ७०० फेरीवाले बसतात.

नौरोजी रोडवरील बरेच फेरीवाले परदेशातून बेकायदेशीरपणे आयात केलेला माल विकतात. त्यांच्या स्टॉलवर मात्र फक्त दहा टक्के माल असतो बाकीचा जवळच्या जुन्या-पुराण्या इमारतीत दडविलेला असतो. त्याची फक्त रिकामी खोकीच स्टॉलवर असतात. गिऱ्हाईकाने पृच्छा करताच त्याला गुदामाकडे नेण्यात येते अगर माल स्टॉलवर आणण्यात येतो.

जवळच्या दुकानदारांचे व फेरीवाल्यांचे संबंध इतके मित्रत्वाचे असतात की एकदा एका विनापरवाना फेरीवाल्याला पकडण्यात आले तेव्हा त्याच्या समोरच्या दुकानदाराने जामीन राहून त्याला सोडवून आणले.

त्या त्या विभागातील पोलिसांकडून येथील फेरीवाल्यांना संरक्षण मिळते, कारण फेरीवाले त्यांना नियमितपणे हप्ता देत असतात. नौरोजी रोडवरील बहुतेक फेरीवाले केरळी वा मद्रासी आहेत व एकाच ठिकाणी पाच ते पंधरा वर्षांपासून धंदा करीत असलेलेही अनेक फेरीवाले आहेत. दुकान व फेरीवाल्यांमधील तोकड्या जागेतून जाणाऱ्या असंख्य पादचाऱ्यांचे मात्र हाल होतात. त्यांना अती मंद वेगाने चालावे लागते. अनेक धक्के निमूटपणे सहन करावे लागतात. तरीपण फेरीवाल्याबद्दल सर्व सामान्य पादचाऱ्यांस सहानुभूती वाटते. सुमारे ७० % पादचाऱ्यांनी रस्त्यावरील पूल चढून जाण्यापेक्षा तो पार करणे पसंत असल्याचे सांगितले.

अशा असंख्य बोलक्या निष्कर्षांचा सूक्ष्मपणे अभ्यास करून व नौरोजी मार्गाचा चाळीस फुटी अतिभव्य आराखडा तयार करून सद्य:स्थिती, वाहनांची वहातूक प्रत्येक फेरीवाल्याचे स्थान, पादचारी मार्ग अशा विविध दृष्टीकोनातून समस्येचा सर्वांगीण अभ्यास केला व काही उपाययोजना सादर केल्या.

---


## पुरंदरच्या बुरुजावरून

**ब. मो. पुरंदरे**

**मूल्य : चार रुपये**

**राजहंस प्रकाशन**
**पुणे ३०**


---

या उपाययोजनांचे स्थूल मानाने सहा प्रकार पाडता येतील. एक म्हणजे नौरोजी रोडवरील वाहनांच्या वाहतुकीत बदल करून म्हणजे ती संपूर्णपणे बंद करून अथवा एकदिशा मार्ग योजून या रोड वरील ताण कमी करता येईल. यासाठी शहीद भगतसिंग रोड व बॉउबी रोड पर्यायी वहातुक मार्ग म्हणून अंमलात आणता येऊ शकतील.

दुसरी म्हणजे आहे त्या परिस्थितीत केवळ फेरीवाल्याच्या स्थानाची विचार पूर्ण पुनर्रचना करून पादचारी मार्ग मोकळा करता येऊ शकेल. यामुळे फेरीवाल्याच्या धंद्यावरही परिणाम होण्याचा धोका उद्‌भवत नाही.

भाटिया बाग व हॉर्निमन सर्कल या सध्या दुर्लक्षिलेल्या भागाची पुनर्रचना करून तेथे फेरीवाल्याची क्षेत्रे निर्माण करता येऊ शकतील. (Hawking Zones)

नौरोजी रोड वरील वाहनांची एक दिशामार्ग वहातुक करून फुटपाथची रुंदी वाढवावी आणि फेरीवाल्यांसाठी व पादचाऱ्यांसाठी मुबलक अशी जागा उपलब्ध करावी अशीही एक उपाययोजना आहे.

सध्या असलेल्या दोन इमारतीमधील गल्लीबोळात फेरीवाल्याचे क्षेत्र निर्माण करावे तसेच वास्तुच्या स्तंभालगतही त्यांच्यासाठी जागा निर्माण करावी त्यामुळे पादचारी वहातुकीला अडथळा निर्माण होणार नाही.

या उपाययोजनांव्यतिरिक्त काही खर्चिक योजनाही अभ्यास गटातील काही विद्यार्थ्यांनी सुचविल्या आहेत. पैकी एक म्हणजे सध्याच्या फूटपाथवर आठ फूट उंचीवर सज्जे बांधून त्यावर फेरीवाल्यांचे क्षेत्र निर्माण करावे. नौरोजी मार्गावरील प्रत्येक वास्तुच्या तळमजल्याची उंची वीस फुटापेक्षा अधिक असल्याने ही गोष्ट अशक्य नाही.

काहींनी तर संपूर्ण नौरोजी रोडवर फ्लाय ओव्हर बांधून त्याखाली पादचारी व फेरीवाल्याचे 'मुक्त क्षेत्र' निर्माण करावे असे सुचविले आहे. खर्चाच्या दृष्टीने या योजना जरी अशक्य कोटीतल्या असल्या तरी परदेशांत अनेक शहरी अंमलात आणल्या गेलेल्या आहेत.

सदर प्रदर्शनाला प्रत्यक्ष श्री. सुधीर जोशींनी भेट देऊन अभ्यास गटाचे कौतुक केले व प्रत्ययकारी, कमीत कमी खर्चाची उपाययोजना अंमल बजावणीसाठी महापालिकेस सादर करीन असे आश्वासन दिले. याशिवाय संबंधित क्षेत्रातील सर्व अधिकाऱ्यांनी प्रदर्शनाला भेट दिली.

आपण काहीतरी वेगळं केलं या समाधानी भावनेनं आम्ही सुखावलो. याबाबत एवढंच सुचवावसं वाटतं की महापालिकेने एक-दोन प्रत्ययकारी योजना निवडून त्यांची प्रायोगिक स्वरूपाची अंमलबजावणी करून मगच सर्वात योग्य अशी उपाययोजना अंमलात आणावी.

—विजय दीक्षित

# चीन

## दहावी काँग्रेस संपल्यानंतर

### जिप्सी मधुकान्त

नुकतीच ११-१२ सप्टेंबरला फ्रान्सचे जॉर्जेस पाँपिदू यांनी चीनला भेट देऊन गुप्त चर्चा केल्याचे वृत्त आहे. तसेच चौ-एन-लाय जगाच्या दौऱ्यावर निघणार असून लंडन, पॅरिस, वॉशिंग्टन या राजधान्यांना भेट देणार असल्याचे वृत्त प्रसृत झाले आहे. पेकिंगमध्ये २४ ऑगस्टला पार पडलेल्या चिनी कम्युनिस्ट पार्टीच्या दहाव्या काँग्रेसने जगाच्या राजकारणात 'अॅक्टीव रोल' घ्यायला मान्यता दिली आहे, त्याचेच हे द्योतक आहे. फ्रान्स आणि चीनने अण्वस्त्र करार धुडकावून लावलेले आहेत. त्यांच्या अण्वस्त्र चाचण्या सुरूच आहेत, त्यामुळे या दोन राष्ट्रांच्या नव्या फुललेल्या भूमिकेत अधिक सख्य असल तर नवल नाही. अमेरिकेचे अध्यक्ष श्री. निक्सन यांचे पेकिंगने अगदी थंडेच स्वागत केले होते. म्हणजे जनसमुदाय वा घोषणा इ. चा अभाव होता. त्या मानाने पाँपिदू यांच्या आगमन प्रसंगी हजारो मुलींनी स्वागत गीते गायिली, तसेच पाँपिदू यांच्यातर्फे चौ-एन-लाय यांनी मेजवानीसुद्धा स्वीकारली. चीनमधील बांबूच्या पडद्याआडील या सर्व हालचालींना जागतिक राजकारणाच्या दृष्टीने एक वेरके गूढ वलय आहे. त्यामुळे निरीक्षक चीनच्या बारीक–सारीक हालचालींकडे अतिशय कुतुहलाने पाहात असतात. चीनच्या राजदूताने एखाद्या समारंभप्रसंगी नुसते स्मित जरी केले तरी राजनीतिज्ञ त्याचे अनेक अर्थ लावीत असतात! चीन संबंधीच्या कल्पना आता पार बदलल्या आहेत. या महासत्तेच्या राजकारणाच्या रंगमंचावरील सूत्रधार आहेत चौ-एन-लाय आणि अंतरंग शिल्पकार माओ. आंतरराष्ट्रीय राजकारणात चंचुप्रवेश 'पिंगपाँग पॉलिसी' द्वारा चौ. नी घडवून आणला. अतिशय दूर दृष्टीच्या आणि कूटनीती कुशल अशा ह्या चीनच्या अंतरंगाचे प्रतिबिंब नुकत्याच झालेल्या पेकिंग

येथील दहाव्या अधिवेशनात उमटले आहे.

## लिन पिआओच्या अस्तानंतर

२४ ऑगस्टच्या ह्या पेकिंग अधिवेशनासाठी खूप संघर्ष अंतर्गत पातळीवर करावा लागला. हे अधिवेशन संपन्न व्हावे, यथानुकूल व्हावे यासाठी बरेच 'ग्राऊंडवर्क' करावे लागले. नव्या प्रतिनिधींच्या नेमणुका करण्यात तर विविध गटांनी शक्तिपरीक्षा केली. लिन पिआओचा अस्त झाल्यानंतरचे हे अधिवेशन. प्रेसिडियम, केंद्रीय समिती, पॉलिटब्यूरो, पॉलिटब्यूरोची नवी स्टॅंडिंग कमिटी यांच्या नेमणुका करण्यात तीन गटांनी खूप शर्थ केली. ते तीन गट म्हणजे चिनी कम्युनिस्ट पक्षातील जुने रक्त, लष्कर आणि सांस्कृतिक क्रांतीनंतर उदयाला आलेले नवीन रॅडिकल्स! माओचे वारसदार आणि चीनचे नेतृत्व हा एक स्वप्नरंजनाचा विषय यापूर्वी होता. मध्यंतरी चौ एन-लाय यांनी एका मुलाखतीत, असे सांगितल्याचे आठवते की, चिनी कम्युनिस्ट पक्षात कसबी, मुरलेले, निष्ठावान असे हजारो कार्यकर्ते आहेत आणि ते सामूहिक नेतृत्व चीनला जरूर देऊ शकतील. वारसाचा प्रश्न उद्भवत नाही! हे वृत्त अनेकांना आठवत असेलच.

पक्षाच्या दहाव्या अधिवेशनाची रचना आणि त्यामागील कर्तृत्व खरे म्हणजे चौचेच आहे. आपल्या अहवाल वाचनात चौ ने लिन पिआओ आणि मास्कोच्या पापी कृत्यांचा निषेध केला. लिन पिआओने दंतकथेसारखे निर्माण केलेले स्वप्नवलय नष्ट केले. लिन पिआओचा पगडा काही अंशी तरी जबर असला पाहिजे. अन्यथा त्याला असे 'विमान अपघाता'त उडवले नसते. आणि लिन अंतर्धान पावला असला तरी नवव्या अधिवेशनात त्याने निर्माण केलेल्या प्रभावाला शह देण्यासाठी नाव घेतले नाही तरी, त्याच्याच धोरणांचे परीक्षण करावे लागले! पक्षाची नवी घटना वांग हुंग वेन ने वाचली. त्यात वारस कल्पनेला, लिनच्या स्थानाला पार वगळले. ◻

पेकिंगच्या ह्या दहाव्या अधिवेशनाचे एक वैशिष्टय म्हणजे फारसा गाजावाजा न घडवता ते उरकले गेले. एरवी 'जनते'च्या अधिवेशनाची वारेमाप प्रसिद्धी करण्यात येते. आणि अधिवेशन संपल्यानंतरच नव्या नेमणुकींची नावे जाहीर करण्यात आली! हे सारे घडविण्यात चौ-एन-लायचा बेरकेपणा निश्चित आहे. 'हे अधिवेशन एकता, सुसूत्रता निर्माण करण्यात यशस्वी झाले' असे 'अधिकृत' वर्णन करण्यात आले, यातच त्याच्या शहा-काटशहाचेही वर्णन अध्याहृत आहे! नवव्या अधिवेशनातही असेच सांगण्यात आले होते. वेगवेगळ्या गटातील असतोल या अधिवेशनात निश्चित जाणवला, असे निरीक्षकांचे मत आहे. शिवाय 'सामूहिक नेतृत्व' ही अलीकडे विशेष कथन केली जाणारी कल्पना. त्यावरही पूर्ण शिक्कामोर्तब करण्यात, सामंजस्य

निर्माण झाले असे मात्र नाही. सांस्कृतिक क्रांतीच्या धुमाळीत लिऊ शाओ ची ला उडवले होते. नववे अधिवेशन लिन-पिआओचे सुवर्ण युग होते! त्याला अधिकृत वारस समजले जात होते. माओबरोबरची त्याची छायाचित्रे आणि त्याचे वाङ्मय, संकलन इत्यादीला खूप भाव आला होता. पण त्याचे कार्य आणि चरित्र आता इतिहासातून लुप्त करून टाकण्यात आले. लिन पिआओला लष्कराचा विशेष पाठिंबा होता आणि माओ-चौ यांचा गट दुसऱ्या बाजूला कलंडला जात होता. वेळीच लिनला तिलांजली देण्यात चौ ने खूप कूटकारस्थाने घडवून आणली. पण केवळ तेवढ्याने संघर्ष संपला, असे या अधिवेशनाच्या इतिवृत्तावरून दिसत नाही खास. चीन एन लायने पद्धतशीरपणे पूर्वीपासूनच लिनच्या दुष्कृत्यांचा पाढा वाचणे सुरू केले होते. तो खरा वारस नव्हता, असे अधिवेशनात जोरकसपणे सांगितले. या सर्व घटनांचा मागोवा घेता, बऱ्याच जणांचे असे मत आहे की, खरा संघर्ष चौ आणि लिन यांच्यामध्येच असावा. चौची सरशी झाली आणि ती होणारच होती!

अधिवेशनाने चीनला नव्या सत्तेची चौकट लाभली आहे. वर सांगितलेल्या तीन गटांचा असमतोल तसा जुनाच आहे. नवव्या अधिवेशनात लष्कराला पॉलिटब्यूरोत जरा अधिक प्राधान्य दिले होते. दहाव्या अधिवेशनातही हे चित्र फारसे बदलले नाही. सूत्रधारांची पकड बदलली आहे, एवढे खरे.

**माओ आणि चौ चे पारडे जड**

पेकिंगच्या सत्तारचनेत सेंट्रल कमिटी व पॉलिटब्यूरो हे केंद्र आहे. तथापी खरी सत्ता नऊ जणांच्या पॉलिटब्यूरोच्या स्टँडिंग कमिटीच्या हातात असते. त्यावरून खरे चित्र कळून येते. ते खरे सूत्रधार. या नव्या निवडलेल्या कमिटीत चौ आणि माओ यांच्याशिवाय आणखी दोन 'जुने आणि जाणते' कार्यकर्ते आहेत. यू तेह आणि तुंग पी वू हे ते दोघे. तथापी वार्धक्याने ते अगदी शिथिल आणि प्रभावहीन आहेत. योह चिएन पिंग आणि ली तेह शेंग हे दोघे लष्कराचे प्रतिनिधी आहेत. त्याशिवाय वॉंग हुंग वेन, चांग चून चिआओ आणि कांग शेंग हे तिघेजण सांस्कृतिक


शनवारवाड्यातील शमादान

ब. मो. पुरंदरे

किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

क्रांतीच्या लाटेतून उदयाला आलेले नव्या दमाचे आहेत. चौ एन लायने इतर समित्यांच्या निवडीतही खूप सावधपणा आणि समतोल साधला आहे असे दिसते. पक्षाच्या सेंट्रल कमिटीत परराष्ट्र मंत्री चि पेंग फै आणि उपपरराष्ट्र मंत्री चिआओ कुआं हुआ यांची नेमणूक केली आहे. हे चौ चे खास म्होरके आहेत. वस्तुतः पूर्ण सत्ता माओ-चौ यांच्या हाती असल्याने त्यांना पाहिजे तो देखावा घडवून आणणे अशक्य नाही. पण सर्वच काही बिनधास्तपणे त्यांना करणे शक्य होत नाही, असे अंतर्गत गटातील संघर्षावरून दिसते. शिवाय हे नको असलेले तण उपटून काढण्यासाठी माओला फार मोठ्या प्रमाणावर सतत नवनवे प्रयोग घडवून आणावे लागतात, हे उघड आहे.

### प्रश्नाचे खरे स्वरूप–रशिया !

लिन पिआओच्या खऱ्या पतनाचे कारण मात्र ह्या दहाव्या अधिवेशनाने स्पष्ट होत नाही. संघर्ष टोकाला पोचण्याइतपत कटोकटीचा झाला, हा तर्क उघड आहे. तथापी आर्थिक प्रश्नांचे निराकारण आणि सोविएत रशियाशी संवाद करण्याच्या पद्धती या मुद्द्यांवरून संघर्ष पेटला असावा, असे जाणकारांचे निदान आहे. हेच प्रश्न लिऊ शाओचीच्या संदर्भात उद्भवले होते. म्हणजे हे नाजूक प्रश्न चीनचे मर्मस्थान बनले असावे, असे मानायला वाव आहे आणि त्यावरून तथाकथित असमतोल व बंडाळी माजण्याची शक्यता आहे. चौ-एन-लायने आपल्या अत्यंत कुशल कूटनीतीने अनेक नवीन पवित्रे टाकून विरोधकांना थक्क केले आहे.

अधिवेशनाच्या अहवालावरून चीनच्या परराष्ट्र नीतीच्या बाबतीत नवे प्रवाह सूचित झाले आहेत. मास्कोविरुद्ध ही नवी लाईन असावी, असेही दिसते. झेकोस्लोव्हाकिया व मंगोलियातून रशियाने सैन्य काढून घ्यावे, अशी स्पष्ट सूचना केली आहे. तसेच अमेरिका वा पाश्चात्य देशांच्या संबंधात नवी सुधारणा करण्यासंबंधीचे आणि मूळच्या धोरणाला मुरड घालण्याचे सार असे कथन केले आहे : Necessary compromises between revolutionary countries and imperialist countries must be distinguished from collusion and compromise between Soviet revisionism & U. S. imperialism. अर्थात चीनचे हे डावपेच निश्चित बेरकेपणाचे आणि अंतर्गत संघर्षावर मात करण्यासाठी असले तरी हा समतोल तात्पुरता असण्याचीसुद्धा शक्यता आहे. नंबरी स्वार्थ हाच स्मितरेषेआडचा खरा अर्थ आहे आणि चीनच्या शक्तिसामर्थ्याने काहीसे दिपून जाऊन पाश्चात्य सत्ता त्याच्याशी हातमिळवणी करण्यासाठी धडपडत आहेत.

● ● ●

कामगार जगत्

# हिंद सायकल्स कामगारांच्या डोक्यावर टांगती तलवार ?

हिंद सायकल्स प्रकरणाची ओळख मी ह्या आधी करून दिलेलीच आहे. (माणूस, दि. २५–८–७३). त्यावेळी शासनाने एक महिन्याची मुदत मागून घेतली होती. त्यामुळे १ ऑगस्टपासून अंमलात यायची टाळेबंदी महिनाभर पुढे ढकलली गेली होती. ह्या महिनाभरात सर्व कामगारांना ले. ऑफ मिळाला होता. ह्या महिनाभरात शासनानं काय केलं? २४०० कामगारांच्या मानेभोवती पडलेला फास ढिला करण्यासाठी शासनाने कोणती पावले उचलली? निदान जी माहिती हातात आली आहे तीनुसार तरी शासनाने ह्या प्रकरणात काही देखील पावले उचललेली नाहीत. आणि एक सप्टेंबरपासून अस्तित्वात आलेली टाळेबंदी टाळण्यासाठीही काही प्रयत्न झाल्याचे ऐकिवात नाही. उलट मध्यंतरीच्या काळात स्टेटबँकेने ह्या कंपनीला काही कोटीचे कर्ज दिल्याची बातमी आहे. हिंद सायकलसमधील सध्याच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी जे काही पर्याय संचालकांनी शासनापुढे ठेवले होते, त्यात, कंपनीला सव्वादोन कोटींची आर्थिक मदत (कर्ज) मिळाली तर कंपनी कारखाना चालू ठेवू शकेल असाही पर्याय होता. जी पैशांची उचल हिंद सायकलसच्याच पतीवर आता कंपनी स्टेट बँकेकडून करणार आहे, त्या रकमेचा ओघ कंपनी मग कारखाना चालू ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या भांडवलाकडे का वळवीत नाही? स्टेट बँकेने हिंद सायकल्सला जी मदत मंजूर केली आहे, ती करताना, नेहमीच्या प्रथेनुसार मदत कशासाठी हवी आहे याचाही तपास केलेला असणारच. मग त्यांच्या मदतीनेच बँकेकडून उचललेला पैसा इतरत्र वापरण्याचे कंपनीच्या चालकांनी ठरवले असेल असे मानावे का? अडीच हजार कामगारांच्या डोक्यावर जी टांगती तलवार आज आहे, ती लक्षात घेता बँकेने वरील शंकांचे निरसन करणे आवश्यक ठरते.

ह्याच संदर्भात शासनाचे धोरण निश्चित काय आहे तेही कळणे आवआहे. इथे कारखाना सुरू असताना व आता बंद असतानाही, हरयाना, गझियाबादमधल्या छोट्या छोट्या व्यावसायिकांकडून सुटे भाग बनवून केवळ 'असेंब्ली' (जुळणी) करून 'हिंद'च्या सायकली अद्यापही मार्केटमध्ये येत आहेत असा एक प्रवाद आहे. मी मागे म्हटल्याप्रमाणे ह्या पद्धतीने उत्पादन करण्यात फायदा अधिक होतो. एक शक्यता अशीही आहे की, कंपनीने

बँकेकडून केलेली उचल कदाचित अशा व्यवहारासाठीही आहे. ही जर वस्तुस्थिती असेल तर, अडीच हजार कामगारांच्या गळचाला बसलेला फास आवळला जात असेल असेच म्हणावे लागेल! कामगारांना देशोधडीला लावून जनतेच्या पैशांची (म्हणजेच बँकेच्या) लूट करण्याचा हा चालकांचा डाव आहे असेही मग म्हणावे लागेल. म्हणूनच शासनाची भूमिका त्वरित जाहीर झाली पाहिजे. वेळ पडल्यास चालकांवर दडपण आणून कंपनीला उपलब्ध होत असलेला पैसा, कामगारांच्या गळयाला बसलेला फास ढिला करण्यासाठी वळवला पाहिजे.

आणि ह्यासाठी शासनाने त्वरित पावलं टाकली पाहिजेत. खंबीर धोरण आखलं पाहिजे. पनवेलच्या धूतपापेश्वर इंडस्ट्रीजच्या बाबतीत दिरंगाई झाल्यामुळे आज तो प्रश्न अवघड होऊन बसला आहे. अलकॉक ॲशकॉकचे कित्येक कामगार देशोधडीला लागलेलेच आहेत. सोलापूरच्या जुन्या गिरणीचेही कित्येक कामगार अजूनही वणवणताहेतच. ह्या साऱ्या प्रकरणांची पुनरावृत्ती हिंद सायकलसच्या बाबतीत घडू नये. त्यासाठी शासकीय धोरणाची दिशा कळणं, निश्चित भूमिका कळणं आवश्यक आहे.

—माणूस प्रतिनिधी

## निवासी डॉक्टर

पृष्ठ १३ वरून

राहू शकणार नव्हता.

डॉक्टर समजोत वा न समजोत पण इतर समजूतदारांनी जाणाव्यात अशा काही गोष्टी या संपाने पुढे आल्या. हस्तिदंती मनोऱ्यातून कुठलीही चळवळ चालू शकणार नाही. जनतेला विश्वासात घेतलेत, कष्टकरी थरांचे सक्रिय सहाय्य मिळविलेत तरच काही तरणोपाय.

आणि बहुधा डॉक्टरही शिकले असावेत. निदान त्यांच्या लढयाच्या पावलांवरून, त्यांच्या नेत्यांच्या भाषणावरून असे वाटू लागलेय. पांढरपेशा वर्गाचा हा पहिलाच लढा की ज्याच्यात ते सरळ कामगारांपर्यंत जाऊन पोचले. कामगार नेत्यांबरोबर गेटागेटावर फिरले. स्वत:ची बाजू सांगत, मदतीचे आवाहन करीत कामगारात मिसळले. जनतेच्या व समाजजीवनाच्या समीप जर हा गट येणार असेल तर फारच उत्तम.

विचार करण्यासारखी आणखीही एक मोठीच गोष्ट आहे. सरकार इतके चिडले का? संप चिरडायला चवताळल्यासारखे का धावले? अनुल्लेखाने ज्यांना सहज मारता आले असते त्यांच्यावर इतका संतप्त हल्ला का? वाढत जाणारे जनता विरोधी कायदे व त्यांचा निर्दय वापर यांचे महत्त्व काय? विरोधाचा, कुठल्याही प्रकारच्या मामुलीसुद्धा लढयाचा सूर हल्ली सरकारला सहन नाहीसा होतोय. का?

ही फॅसिझमची चाहूल तर नव्हे?

● ● ●

नवसायासानं झालेलं पोरगं
लाडागोडात, दुधातुपात वाढलेलं मूल
रगेल आणि रंगेल म्हणून गावात ओळखला जाणारा
पण खुनाचा आरोपी म्हणून जन्मठेप भोगणारा तरुण
हरहुन्नरी म्हणून ओळखला जाणारा हा गजाआडचा माणूस

त्याची आहे ही झंझावाती कहाणी

**कैदी नंबर....?**

सादर करीत आहेत ज्योत्स्ना देवधर

**माणूस दिवाळी अंक**

# सन्मित्रचा रौप्यमहोत्सव

गेले अर्धशतक ज्या काही क्रीडासंस्था क्रीडाक्षेत्रात सातत्याने व अविरत सेवा करीत आहेत त्यात भारतीय खेळाची जोपासना करणारा सन्मित्र संघ अग्रगण्य ठरेल. सन्मित्र संघ यावर्षी सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहे हा सोहळा नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात होणार आहे. अर्थात गेल्या ५० वर्षात नुसत्या मैदानापुरते क्षेत्र मर्यादित न ठेवता क्रीडाक्षेत्रात विविध उपक्रम, संशोधन करून ते यशस्वी पार पडण्यात सन्मित्र संघ यशस्वी ठरला आहे.

महाराष्ट्रात, महाराष्ट्राबाहेर खोखो कबड्डीत महान पराक्रम करून अजिंक्यपदाची उज्वल परंपरा या संस्थेने कायम ठेवली आहे. अनेक पारितोषिके क्रीडाशिष्यवृत्त्या सन्मित्र संघाच्या खेळाडूंनी अनेकवेळा पटकाविल्या आहेत.

निरनिराळ्या भारतीय मैदानी खेळाच्या स्पर्धा मोठ्या प्रमाणावर या संस्थेने भरविल्या होत्या तर आट्यापाट्या, खोखो, कबड्डी यांची शिक्षणशिबिरे आयोजित करण्यात आली होती. कबड्डीचे पोर्टेबल क्रीडांगण, तरुण, वृद्ध स्त्रिया व लहान मुलांचे सामने, खोखो खेळात सर्वांना समान संधी मिळावी म्हणून तीन डाव, कबड्डीतील नवीन गुणपद्धती हे उपक्रम सन्मित्र संघाच्या आजवरच्या परिश्रमांचे द्योतक आहे. श्री. हरिभाऊ साने यांचे अपार परिश्रम व जिद्द सन्मित्र संघाच्या या यशाच्या पाठीमागे आहेत. त्यांची क्रीडाक्षेत्रात काम करण्याची धडाडी व उत्साह संघाच्या स्थापनेपासून आजतागायत आहे. श्री. श्रीकांत टिळक यांच्या अभ्यासपूर्ण कल्पना व श्रम हेही त्याला सहाय्यभूत आहेत.


अशा ह्या कर्तबगार सन्मित्र संघाची सुवर्णमहोत्सव साजरा करण्याची कल्पनाही भव्य आहे. अखिल भारतीय खोखो, कबड्डी बरोबर स्त्रिया व लहान मुलांचे सामने, भावी आट्यापाट्या, रस्सीखेच, ज्यूडो, सांघिक जोर वगैरे प्रकारांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे मॅटवरील कुस्त्या, कॅलथिनीस, लोकनृत्य एस. आर. पी. संचलन यांची प्रात्यक्षिके होणार आहेत. यानिमित्ताने एक व्यायाम परिषद, भारतीय खेळांच्या पुण्यातील संघाचे एक प्रदर्शन भरविण्यात येणार आहे.

असा हा अभिनंव महोत्सव पुण्याच्या क्रीडाक्षेत्राचे खचितच आकर्षण ठरेल !

—शरद भाटे

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयांत प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649



**Hats off to the Railwaymen of Sholapur Division, S. C. Rly.**

१५ ऑगस्ट ते २४ सप्टेंबर ७३ –
१९६६ पासूनच्या रेल्वे कर्मचाऱ्यांच्या
आंदोलनातलं एक दैदिप्यमान पर्व !
बघता बघता हे आंदोलन सामान्य जनतेचं
प्रवाशांचं, विद्यार्थ्यांचं आणि
व्यापाऱ्यांचंहि बनलं.
ह्या साऱ्यांच्या अभेद्य जुटीपुढे
शासन अवाक् झालं. कर्मचाऱ्यांच्या
मनाजोगते निर्णय झाले.
थोडी देवाण–घेवाणहि झाली !
आणि घडलं ते सारं प्रस्थापित
नेतृत्वाला दूर ठेवून ! !



**अशा ह्या**
**आगळ्या आंदोलनाची**
**ही सविस्तर कहाणी**
**पुढील अंकी**